विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र
दैनिक यशवंत
✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शुक्रवार दि. ३१ मे २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१९३ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

**सुविचार**
निर्बल व खाली मन कभी भी समर्थ संकल्प उत्पन्न नहीं कर सकता ।

# शेवटच्या टप्प्यातील हाय-प्रोफाइल प्रचार संपला



लखनऊ : लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातील हाय-प्रोफाइल प्रचार आज संपला. यात उत्तरप्रदेशातील १३ जागांसाठीचा प्रचार, ज्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिनिधित्व असलेल्या वाराणसी आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे मूळ गाव गोरखपूर यासारख्या हाय-प्रोफाइल मतदारसंघांचा समावेश आहे.

उत्तर प्रदेशचे मुख्य निवडणूक अधिकारी नवदीप रिनवा यांनी माहिती दिली की लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्यांतर्गत राज्यातील १३ लोकसभा मतदारसंघांसाठी १ जून रोजी मतदान होणार आहे. तसेच सोनभद्र जिल्ह्यातील दुधी विधानसभा मतदारसंघासाठीही पोटनिवडणूक होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, सातव्या टप्प्यात १३ लोकसभा मतदारसंघांसाठी १३४ पुरुष आणि १० महिला असे एकूण १४४ उमेदवार रिंगणात आहेत.

सीईओ म्हणाले की लोकसभेच्या १३ जागांपैकी ११ सर्वसाधारण प्रवर्गातील आणि २ अनुसूचित जातींसाठी राखीव आहेत. या टप्प्यातील १३ लोकसभा मतदारसंघ म्हणजे महाराजगंज, गोरखपूर, कुशीनगर, देवरिया, बांसगाव, घोसी, सलेमपूर, बलिया, गाझीपूर, चंदौली, वाराणसी, मिर्झापूर आणि रॉबर्टसगंज.

ते म्हणाले की, सातव्या टप्प्यातील या १३ लोकसभा मतदारसंघात २.४९ कोटी मतदार असून त्यापैकी १.३२ कोटी पुरुष मतदार आणि १.१७ कोटी महिला मतदार आहेत, जे रिंगणातील उमेदवारांचे भवितव्य ठरवण्यास पात्र आहेत.

ते पुढे म्हणाले, एकूण १४,१८३ मतदान केंद्रे आणि २५,६५८ मतदान केंद्रे आहेत जिथे सकाळी ७ ते संध्याकाळी ६ या वेळेत मतदान होईल.

हाय-प्रोफाइल जागांपैकी वाराणसी हा भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. येथे १९९६ पासून एकदाही भाजपाचा पराभव झालेला नाही. २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी येथून निवडून आले. वाराणसीमधून तिसऱ्यांदा निवडून येण्याची मागणी करत असलेले पीएम मोदी यांनी २०१९ मध्ये एकूण मतांपैकी ६३ टक्के मते मिळवून मोठा विजय मिळवला. यावेळी त्यांचा सामना प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष अजय राय आणि बसपचे अथर जमाल लारी यांच्याशी आहे.

**(पान ७ वर)**

## केरळमध्ये मान्सून दाखल

मुंबई : दोन दिवस आधीच म्हणजे आज गुरुवार, दि. ३० मे रोजी मान्सून केरळमध्ये दाखल झाला आहे. उत्तर पूर्व भारत आणि केरळमध्ये मान्सूनचे आगमन झाले आहे, अशी माहिती भारतीय हवामान विभागाने दिली आहे.

हवामान विभागाने म्हटले आहे की, नैऋत्य मोसमी पावसाने आज ३० मे २०२४ रोजी केरळ आणि ईशान्य भारताच्या बहुतांश भागांमध्ये प्रवेश केला आहे. दरम्यान आज कोकणात हलक्या सरी कोसळण्याची शक्यता देखील विभागाने वर्तवली आहे.

दरवर्षी १ जून रोजी केरळात दाखल होणारा मान्सून यंदा ३१ मे रोजी केरळमध्ये दाखल होईल अशी शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली होती. परंतु यापूर्वीच म्हणजे दरवर्षीपेक्षा यंदा दोन दिवस आधीच मान्सून केरळात दाखल झाला असल्याचे हवामान विभागाने पोस्ट करत सांगितले आहे.

# परदेशी कशाला जायचं? गड्या आपला गाव बरा!



नवी दिल्ली - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सध्या त्यांच्या गावी मुक्कामी आहेत. महाबळेश्वर तालुक्यातील दरे गावातच ते तीन दिवस मुक्काम करत आहेत. यावेळी त्यांनी एक्सवर (ट्विटर) एक व्हिडिओ शेअर केला आहे. या ट्विटमधून त्यांनी अप्रत्यक्षरित्या उद्धव ठाकरेंना टोला लगावला आहे. सध्या मुख्यमंत्र्यांच्या या ट्विटची सध्या चांगलीच चर्चा रंगली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे तीन दिवस सातारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. मंगळवारी ते दरे या त्यांच्या मुळगावी दाखल झाले होते. यावेळी गावात असतानाचं त्याचे वेळापत्रक कसे होते. याची एक झलक त्यांनी व्हिडिओतून दाखवली आहे. तसंच, व्हिडिओ पोस्ट करताना त्यांनी एक ट्विट केलं आहे. या ट्विटमध्ये त्यांनी परदेशी कशाला जायचं, गड्या आपला गावच बरा असं म्हणत अप्रत्यक्षरित्या उद्धव ठाकरेंना टोला लगावला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, उद्धव ठाकरे हे सध्या परदेशात आहेत. त्यामुळं एकनाथ शिंदेचे हे ट्विट म्हणजे उद्धव ठाकरेंना अप्रत्यक्ष टोमणा असल्याची चर्चा रंगली आहे. **(पान ७ वर)**

# आध्यात्मिक सेवेसोबत वैभव सेवा महत्त्वाची :डॉ. अर्चनाताई पाटील



लातूर / प्रतिनिधी- आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये आध्यात्मिक सेवेसोबत दुसऱ्यांना आनंद देणारी वैभव सेवा महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी नुकतेच केले.

बियांड व्हीजन फाउंडेशन, नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाइंड, लातूर क्रिकेट असोसिएशन फॉर दि ब्लाइंड ऑफ महाराष्ट्र, ॲड. धनंजय चिताडे आणि एस. एम. आर. मित्र मंडळाच्या आर्थिक सहकार्यातून लातूर, नांदेड, धाराशिव, बीड, मुंबई, पुणे, सोलापूर, धुळे, कोल्हापूर व सातारा जिल्ह्यासह ग्रामीण भागातील दृष्टी दिव्यांग व्यक्तींसाठी सामाजिक आध्यात्मिक सहलीचे आयोजन दि. २९ मे ते ३ जून २०२४ या कालावधीमध्ये करण्यात आले आहे याचा शुभारंभ कार्यक्रम हॉटेल पार्थ येथे आयोजित करण्यात होता यावेळी त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.

यावेळी विचारमंचावर नॅबचे अध्यक्ष डॉ. विजयभाऊ राठी, श्रीमती गंगाबाई चिथाडे, प्राचार्य डॉ. संजय गवई, ॲड. धनंजय चिथाडे, सामाजिक कार्यकर्ते कालिदास माने, फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. माधव गोरे, सचिव संदीप चोपडे, उपाध्यक्ष प्रा. सुशील शेळके, कोषाध्यक्ष मीरा चोपडे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की, दिव्यांग बंधू-भगिनींची धार्मिक सहल आयोजन करण्यामध्ये मला सहभागी होता आले याचा मला मनस्वी आनंद आहे. या सहलीच्या माध्यमातून दृष्टीबाधित व दिव्यांगांना देव देवतांचे दर्शन होणार आहे. खरे पाहिले तर आपण मंदिरात गेल्यानंतर स्वतःचे डोळे बंद करून दर्शन घेतो व नामस्मरण करतो परंतु दृष्टीबाधित दिव्यांग म्हणून जीवन जगत असताना सातत्यानेच दररोज डोळे मिटलेलेच असल्यामुळे आपण सतत नामस्मरण करतात व ईश्वर प्राप्ती करता. आपल्या दिव्य चक्षूनी **(पान ७ वर)**

# मतमोजणी कक्षातील पूर्वतयारीची जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांनी केली पाहणी



लातूर, / प्रतिनिधी- : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी प्रक्रिया मंगळवारी (दि. ४) बार्शी रोडवरील शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन येथे होणार आहे. या मतमोजणीसाठी करण्यात येत असलेल्या पूर्वतयारीचा जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी आढावा घेतला. तसेच मतमोजणी कक्षाची पाहणी करून अनुषंगिक सूचना दिल्या.

अपर जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपजिल्हाधिकारी संगीता टकले, प्रियांका आयरे, नितीन वाघमारे, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, शरद झाडके, सुशांत शिंदे, मंजुषा लटपटे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मतमोजणीसाठी सहा विधानसभा क्षेत्रनिहाय स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक कक्षात १४ टेबलवर मतदान यंत्रातील (ईव्हीएम) मतमोजणीची प्रक्रिया होणार आहे. तसेच टपाली मतमोजणीसाठी स्वतंत्र व्यवस्था असणार आहे. या अनुषंगाने करण्यात आलेल्या तयारीचा जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी आढावा घेतला. यावेळी संबंधित विधानसभा क्षेत्रासाठी नियुक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतमोजणी दिवशी **(पान ७ वर)**



# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यासोबत शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सहृदय सत्कार संपन्न



लातूर / प्रतिनिधी- श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील प्राचार्य कक्षामध्ये एस.एस.सी. शालांत प्रमाणपत्र परीक्षा २०२४मध्ये उत्तीर्ण विद्यार्थी आणि शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी शाल, स्मृतिचिन्ह, पुष्पहार आणि पेढे देऊन सहृदय सत्कार केला. यावेळी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे संचालक ॲड. काशिनाथ साखरे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, डॉ. बाळासाहेब गोडबोले, प्रा. किसनाथ कुडके, प्रा. व्यंकट दुडिले आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांचा चि. सार्थक संजय गवई, (५१.४० टक्के), प्रा. व्यंकट दुडिले यांचा चि. प्रणव व्यंकट दुडिले (९६ टक्के), ग्रंथालय कर्मचारी संजय गिरी यांची कन्या कु. ऋतुजा संजय गिरी (९२.४० टक्के ), शिक्षकेत्तर कर्मचारी अनिल उस्तुर्गे यांचा चि. प्रज्वल अनिल उस्तुर्गे (९२.६० टक्के), कार्यालय कर्मचारी महादेव स्वामी यांची कन्या कु. मानसी महादेव स्वामी (८३.८० टक्के) या सर्वाचा शाल, स्मृतिचिन्ह, पुष्पहार आणि पेढे देऊन सहृदय सत्कार करण्यात आला.

यावेळी गुणवत्ताधारक विद्यार्थी मनोगते व्यक्त करताना म्हणाले की, सातत्यपूर्ण अभ्यास, वेळेचे नियोजन, मनाचे व्यवस्थापन, कोणत्याही खाजगी शिकवण्या न करता महाविद्यालयातील शिक्षण प्रणाली उपयोग आणि शिक्षकावर विश्वास यामुळेच आम्ही हे संपादन करू शकलो. तसेच उच्च शिक्षण घेणे, आय.आय.टी., नीट, जेईई या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याचा माणसही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी डॉ. बाळसाहेब गोडबोले, प्रा. शिवशरण हावळे, प्रा. व्यंकट दुडिले, प्रा. किसनाथ कुडके, महादेव स्वामी, अनिल उस्तुर्गे आणि संजय गिरी यांनीही आपली मनोगते व्यक्त केली.

अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय हा एक परिवार असून परिवारात होणारा आनंद सर्वांनी मिळून साजरा करावा. विद्यार्थ्यांची मनोगते ऐकावीत, महाविद्यालयाला गतवैभव प्राप्त करून द्यावे आणि शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अकरावी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेमध्ये प्रवेश घ्यावा यासाठी या उपक्रमांची नितांत आवश्यकता असल्याचे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांनी केले. तर आभार ,प्रा. किशनाथ कुडके यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता विनायक लोमटे, रत्नेश्वर स्वामी, महादेव स्वामी, यशपाल ढोरमारे, राम पाटील, रमेश राठोड, श्रीशैल्य पाटील, बालाजी डावकरे, संदीप मोरे, आनंद खोपे आदींनी परिश्रम घेतले.

# आ. अमित देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी विविध संस्था पदाधिकाऱ्यांसह नागरीकांच्या घेतल्या भेटी



लातूर प्रतिनिधी - राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी गुरुवार दि. ३० मे रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकाऱ्यांसह नागरिकांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन निवेदनाचा व निमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.

यावेळी माजी आमदार वैजनाथराव शिंदे, लातूर शहर जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ड. किरण जाधव, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन ॲड. समद पटेल, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, उपसभापती सुनील पडीले, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन धनंजय देशमुख, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन रवींद्र काळे, माजी उपनगराध्यक्ष मोहन माने, लातूर जिल्हा कॉँग्रेस विधी विभागाचे अध्यक्ष ॲड. प्रवीण पाटील, गणेश एसआर देशमुख, दगडूसाहेब पडिले, सिकंदर पटेल, राजकुमार होळीकर, राजा माने, ॲड. तिरुपती शिंदे, ॲड. विक्रांत सूर्यवंशी, ॲड. किशोर सूर्यवंशी, ॲड. तानाजी कणसे, ॲड. अनंत हिप्परकर, ॲड. रणजीत पाटील, ॲड. सचिन माने, कमलाकर अनंतवाड, प्रा. सुधाकर मोरे, मोहन पाटील, संजय बिराजदार, सलीम तांबोळी, बाळकृष्ण माने, अजित काळदाते, वीरसेन भोसले, रवी पाटील, बाळासाहेब मोरे, बोरीचे सरपंच शंकर पाटील, बाभळगावचे उपसरपंच गोविंद देशमुख, बाळकृष्ण धायगुडे, ड. विजय गायकवाड, प्रा. डॉक्टर सिद्राम कटारे, प्रवीण घोटाळे, तबरेज तांबोळी, आनंद मालू, ॲड. अतिश चिकटे, श्याम जाधव, अब्दुल्ला शेख, इसरार पठाण, मुस्तकीन सय्यद, जफर नाना आदिसह कॉँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक उपस्थित होते.

# तिव्र निषेध करीत आमदार जितेंद्र आव्हाडाचा पुतळा जाळला



अहमदपूर / प्रतिनिधी- आज महाड येथे अंदोलनाची स्टंटबाजी करीत असताना शरद पवार गटाचे राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड याने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो फाडून त्यांचा अवमान केला आहे.या घटनेचा निषेध करीत येथील सम्राट मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी पदाधिकाऱ्यांनी आमदार जितेंद्र आव्हाड याच्या पुतळ्यास जोडे मारले तसेच पूतळा जाळून निषेध केला.

जिथं जिथं जितेंद्र आव्हाड जाईल तिथे त्याच्या तोंडाला भिमसैनिकांनी काळे फासावे असे अवाहनही केले. तसेच स्टंट बहाद्दर जितेंद्र आव्हाडावर गून्हा दाखल करण्याची मागणी केली. या अंदोलनात सचिन बानाटे,रितेश रायभोळे,दिलीप सोनकांबळे विशाल शिंदे,वैभव सोनकांबळे, सुमित कांबळे,दिनेश तिगोटे, सुशांत गायकवाड,अभय गायकवाड रोहन गायकवाड,सुरज रायभोळे , अभय गुळवे,जय गूळवे,अजय आचार्य,अजिंक्य बनसोडे , सुनील बनसोडे,छकुल सरवदे आदींनी सहभाग नोंदविला. अत्यंत संवेदनशीलतेने निषेध करीत अंदोलन करणाऱ्या सम्राट मित्र मंडळाच्या पदाधिकारी कार्यकर्ते यांचे अभिनंदन केले.

# म. बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या विद्यालयांचे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत उत्तुंग यश

लातूर / प्रतिनिधी : लातूर येथील श्री म. बसवेश्वर शिक्षण संस्था द्वारा संचलित श्री देशिकेंद्र विद्यालयाचा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल ९९.४१ टक्के लागला असून यात आठ विद्यार्थ्यांनी १०० , १०० विद्यार्थ्यांनी ९५ पेक्षा अधिक तर १११ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवून विद्यालयाच्या निकालाची उज्वल परंपरा याही वर्षी कायम ठेवलेली आहे.

सविस्तर वृत्त असे की, मार्च २०२४ मध्ये झालेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत श्री देशीकेंद्र विद्यालयाचे ६८८ विद्यार्थी परिक्षेत सहभागी झाले होते. त्यापैकी ६८४ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले असून, यात ४६६ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तिर्ण झाले आहेत. तसेच १४७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ६० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर ११ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत.

या विद्यालयाचा शेकडा निकाल ९९.४१% इतका लागलेला असून यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये कु. संजना कल्याणी, कु. प्रीती बेडदे, कु दिव्या किरडे चि शुभम कुलकर्णी चि मुशरफ सय्यद चि अर्जुन



सूर्यवंशी चि आर्यन बोंडगे या आठ विद्यार्थ्यांनी १०० गुण मिळविलेले आहेत.

तसेच संस्थेच्या श्री शंभुलिंग शिवाचार्य माध्यमिक विद्यालय लातूरचा निकाल १०० लागला असून २२ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण घेतलेले आहेत. त्यामध्ये विद्यालयातून कु वैष्णवी इप्पर व चि आदित्य साळुंखे हे ९८% गुण घेऊन प्रथम, चि विशाल राठोड हा ९६.८०% गुण घेऊन द्वितीय तर चि आदित्य चिकटे हा ९६.४०% गुण घेऊन तृतीय आलेला आहे.

तसेच श्री निळकंठेश्वर माध्यमिक विद्यालय लातूरचा निकाल ९४.४४ लागला असून विशेष प्राविण्यासह १९ विद्यार्थी , प्रथम श्रेणीत २२ विद्यार्थी , द्वितीय श्रेणीत आठ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत.

विद्यालयाच्या या यशात विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे अथक परिश्रम, पालकांचे योग्य मार्गदर्शन यांच्या समन्वयातून लागलेला असून संस्थाचालकांची प्रेरणा व मार्गदर्शन ही यासाठी मोलाचे ठरलेली असल्याचे गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून स्पष्ट केले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे म. बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसे चिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील आप्पा मिटकरी कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडीगावे तसेच सर्व सन्माननीय संचालक श्री राजेश्वर बुके श्री बसवराज येरटे एड. काशिनाथ साखरे, सौ ललिता पांढरे, श्री राजेश्वर पाटील, श्री बाबुराव तरगुडे, श्री प्रभू आप्पा पटणे, प्रा गुरुलिंग धाराशिवे, डॉ महेश हालगे, संस्था कर्मचारी ,सर्व मुख्याध्यापक पर्यवेक्षक व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# हुक्का व ई सिगारेटचे सेवन म्हणजे कर्क रोगाला आमंत्रण!

## या विषयावर महादेव खळुरे यांचा आकाशवाणीवर संवाद!

अहमदपूर दि.३०( कारामुंगीकर)- येथील यशवंत विद्यालयातील राज्यपुरस्कार प्राप्त कला शिक्षक महादेव खळुरे हे ३१ मे रोजी जागतिक तंबाखूविरोधी दिनाच्या औचित्य साधून परभणी आकाशवाणी केंद्रावरुन ३१ मे रोजी सकाळी १० वाजता शालेय मुले व युवकांनी व्यसनापासून दूर रहाण्यासाठी हुक्का व ई सिगारेट चे सेवन म्हणजे कर्क रोगाला आमंत्रण! या विषयावर युवकांसाठी संवाद साधणार आहेत.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, युवकांना तंबाखूजन्य पदार्थाचे व्यसन हे शालेय व महाविद्यालयीन जीवनातच जडत असते. अनेक जाहिरातीतून मुलांना व्यसनाकडे आकर्षित करुन घेतले जात आहे. साधी सुपारीपासून ते गुटख्यापर्यंतचा प्रवास हे शालेय जीवनात सुरु होतो. हे व्यसन लागू नये म्हणून शासन स्तरावरून अनेक प्रयत्न केले जातात. शालेय व महाविद्यालय परिसरात तंबाखूजन्य पदार्थाची सर्रास विक्री होताना दिसून येते. १३ ते २१ या वयोगटातील विद्यार्थ्यांना व्यसनापासून दुर ठेवण्यासाठी पालक शिक्षक व समाजाने लक्ष देणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांना तंबाखूजन्य पदार्थांचे व्यसन जडले तर ते व्यसन सुटत नाही. समाजातील जेष्ठ व्यक्ती, विविध सामाजिक संघटना अशा युवकांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी प्रयत्न करावे. शाळेच्या वेळात विद्यार्थ्यांकडे शिक्षकांचे लक्ष असते पण शाळाव्यतिरिक्त अन्य वेळी पालकांनी आपला पाल्य काय करतो, कुणासोबत फिरतो, काय खातो, याकडे लक्ष ठेवले तर मुले व्यसनापासून दूर राहु शकतात. राज्यात सन २०१२ पासून गुटखा विक्रीवर बंदी आहे. तरीही राज्यात सर्रासपणे गुटखा विक्री होताना दिसून येते. गुटख्यामुळे अनेक मुले विविध आजारांनी ग्रासलेले



आहेत. तंबाखू मध्ये असलेले हानिकारक रसायने हे शरीरासाठी घातक आहेत. निकोटीन हा रसायन परत-परत व्यसन करण्यास परावृत्त करीत असतो. यामुळे मुले हेकेखोर बनतात, चिडचिड करतात, ताणतणाव वाढतो व आईवडिलांना त्रास देत असताना पहावयास मिळते. सुजान युवकांनी मित्र, नातेवाईक, शेजारी, समाजातील प्रत्येक घटकातील नागरिकांना व्यसनापासून दूर राहण्यासाठी प्रयत्न केल्यास नक्कीच देश व्यसनमुक्त देश बनल्याशिवाय राहणार नाही. अशा गंभीर व राष्ट्रीय समस्येवर महादेव खळुरे यांनी आकाशवाणी परभणी येथून युवकांसाठी संवाद साधला.

वरील उपक्रमाबद्दल टागोर शिक्षण समितीचे अध्यक्ष डॉ. अशोकराव सांगवीकर, सचिव डी. बी. लोहारे गुरुजी, उपाध्यक्ष डाँ भालचंद्र पैके, सहसचिव डाँ सुनिता चवळे, प्राचार्य गजानन शिंदे, उप मुख्याध्यापक राजकुमार घोटे, पर्यवेक्षक आशोक पेद्देवाड, रामलिंग तत्तापुरे यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन आणि कौतुक केले आहे.

# प्रा.रवीकुमार बापूसाहेब कदम यांचे निधन



अहमदपूर दि. ३० (प्रतिनिधी) : अहमदपूर येथील महात्मा गांधी महाविद्यालया चे प्राध्यापक व बाबळदरा ता.अहमदपूर येथील रहिवासी रवीकुमार बापूसाहेब कदम यांचे दुःखद निधन झाले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, आज दि.३० मे २०२४ रोजी पहाटे प्रा.रवीकुमार बापूसाहेब कदम यांचे दुःखद निधन झाले आहे. प्रा.डॉ.रवी कदम हे येथील महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालय, अहमदपूर तालुका अहमदपूर जिल्हा लातूर येथे इंग्रजी विषयाचे प्राध्यापक होते. यांचे सोलापूर येथे एका खाजगी हॉस्पिटलमध्ये आज दिनांक ३० मे २०२४ रोजी पहाटेच्या सुमारास दुखःद निधन झाले आहे.

२५ मे रोजी रात्री अंबाजोगाईहून अहमदपूरला येत असतांना परचंडा पाटीजवळ त्यांच्या कारला भिषण अपघात झाला व त्यात त्यांच्या मेंदूला जबरदस्त मार लागल्यामुळे त्यांना उपचारासाठी सोलापूरला हलविण्यात आले होते.

प्रा. रवी कदम हे परशुराम विद्यालय मोघा येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक बापूसाहेब कदम यांचे चिरंजीव व अहमदपूर येथील स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. वर्षा कदम -भोसले यांचे लहान भाऊ होत.

त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगी,एक मुलगा ,वडील, बहिण असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने महात्मा गांधी महाविद्यालय व अहमदपूरच्या शिक्षण क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.

आज ३० मे रोजी सायं. ४ वाजता मोंढा रोड, सार्वजनिक स्मशानभूमी अहमदपूर येथे त्यांच्या पार्थिवावर अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार होणार आहेत.

त्यांच्या दुःखद निधनाबद्दल सर्व स्तरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# गरीबांचा डॉक्टर ही आयुष्यातील गौरवशाली पदवी आहे :माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर

लातूर / प्रतिनिधी- विविध क्षेत्रात कार्य करीत असताना तो व्यक्ती आपल्यामध्ये असलेल्या संस्काराप्रमाणे कार्य करतो. भारतीय नागरिकांचे भाग्य जगात सर्वाधिक चांगले आहे. देशात प्रभू रामचंद्र, छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रभक्त स्वामी विवेकानंद, स्वामी दयानंद, महात्मा बसवेश्वरांसारखे त्रिलोकांचे कल्याण करणारे कार्य व विचार जगाला दिले त्याच विचारामुळे व आईवडिलांच्या आशीर्वादामुळे डॉ.जयश्रीताई धुमाळ व डॉ.अशोक धुमाळ साहेबांनी वैद्यकीय व्यवसायात अतुलनीय कार्य केले. पैशापेक्षा सेवेला अधिक प्राधान्य दिले त्यामुळे त्यांना गरीबाचे डॉक्टर अशी पदवी सामान्य नागरिकांनी दिली ही आयुष्यातील गौरवशाली पदवी आहे असे अभ्यासपूर्ण विचार भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केले.

यावेळी ते डॉ.जयश्री धुमाळ लिखीत घेतला वसा या ऐतिहासिक आत्मचरित्राचा प्रकाशन सोहळा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील हॉटेल अंजनी च्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खा.डॉ.गोपाळराव पाटील हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी खा.डॉ.जे.एम.वाघमारे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ.नागोराव कुंभार, प्रा.डॉ.जयद्रथ जाधव, डॉ.नानासाहेब जाधव, ज्येष्ठ कवयित्री उषाताई भोसले, डॉ. अशोक धुमाळ, अजिंक्य धुमाळ, अपूर्व धुमाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी आ.कव्हेकर म्हणाले की, भारत देशातील वैद्यकीय क्षेत्रामधील प्रसिध्द डॉक्टर एम.सी.मोदीजी यांचा लातूर येथे घेतलेल्या आय कॅम्पमध्ये डॉ.डवले साहेब, डॉ. कुकडे काका यांच्या केलेल्या कार्याचा गौरव करीत डॉ.धुमाळ यांच्या सेवा कार्याचा गौरवही त्यांनी यावेळी बोलताना केला.

नवीन तंत्रज्ञानामुळे जगात आश्यर्चकारक बदल

जगामध्ये रोबोटेक, आर्टिफिशल इंटिलिजिएन्स (एआय) मुळे वैद्यकीय, कृषी, उद्योग, शिक्षण या सर्व क्षेत्रात क्रांतीकारी बदल होत आहेत. देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांनी या तंत्रज्ञानाचा स्वीकार केला आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात मानवाला कामाच्या मार्यादा येणार आहेत. नवीन तंत्रज्ञान भारताने स्वीकारल्यामुळे जगामध्ये सर्वाधिक गुंतवणूक भारतात होत आहे. त्यामुळे येणाऱ्या २०३४ पर्यंत भारत महासत्ता बनेल असा विश्वास माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. कार्यक्रमाच्या प्रारंभी संयोजन समितीच्यावतीने प्रमुख मान्यवरांचा सन्मान, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अशोक धुमाळ यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.जयश्री धुमाळ, प्रा.डॉ.नानासाहेब जाधव, प्रा.डॉ.जयद्रथ जाधव, उषाताई भोसले, प्राचार्य अनिरूध्द जाधव आदींनी मनोगत व्यक्त केले. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रा.डॉ. नानासाहेब जाधव यांनी मानले.

फळाची अपेक्षा न करता सेवेमध्ये सातत्य ठेवण्याचे काम डॉ.धुमाळ यांनी केले

- माजी खा.डॉ.गोपाळराव पाटील

घेतला वसा हे पुस्तक वाचनीय आहे. त्यांच्या या साहित्यातून व कार्यातून सहहृदयता दिसून आली.



आपली सेवा व साहित्यातून गरजूंना आधार देण्याचे काम डॉ.धुमाळ यांनी केलेले आहे. या कुटुंबियाचा दृष्टिकोन विशाल आहे. त्यांच्या या सेवा वृत्तीतून पेशंट व गरजुंना व मोठी मदत करण्याचे काम केलेले आहे. या कुटुंबियांनी भारत भ्रमण केलेले आहे. सेवा व साहित्यातून कुठल्याही फळाची अपेक्षा न करता सातत्य ठेवण्याचे काम डॉ.धुमाळ कुटुंबियांनी केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या या साहित्य कृतीस शुभेच्छा. त्यांची ही साहित्य क्षेत्रातील वाटचाल अशीच यशस्वी होत जावो, अशी अपेक्षाही माजी खा.डॉ. गोपाळराव पाटील यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.

पृथ्वीवरचा स्वर्ग निर्माण करण्याचे काम लेखकाने केले - डॉ.जे.एम.वाघमारे

घेतला वसा या आत्मकथनाच्या माध्यमातून वैयक्तिक इतिहास मांडण्याचे काम केलेले आहे. यामध्ये समाजाचा, राष्ट्राचा इतिहास तसा आपलाही इतिहास आहे. आपले जीवन म्हणजे प्रवास हा माणसाचा इतिहास आहे. परंतु डॉ.धुमाळ यांनी टू इन वन कुटुंबाचे यशस्वी जवीन मांडण्याचा प्रयत्न याबरोबरच त्यांनी आपल्या आत्मचरित्रातून नाते सांभाळण्याचा प्रयत्न केलेला आहे. व्यक्ती आणि व्यक्तिमत्त्व कसे असते. हे दाखवून देण्याचा प्रयत्नही त्यांनी केलेला आहे. याबरोबरच ज्याच्या घरी ग्रंथ नाही, तो सुशिक्षित होऊ शकत नाही. त्यामुळे विचारांचा झरा कायम वाहण्यासाठी वाचनामध्ये सातत्य ठेवणे गरजेचे आहे. वाचनाबरोबरच वाचलेले साहित्य अंमलात आणण्याचा प्रयत्न करनेही गरजेचे आहे. या साहित्यातून स्वतःचा इतिहास, व्यक्ती आणि व्यक्तिमत्त्व व नाते जपण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे हे साहित्य लेखन प्रत्येकाला आपलेसे वाटते. खऱ्या अर्थाने या साहित्यातून पृथ्वीवरचा स्वर्ग निर्माण करण्याचे काम लेखिकेने केलेले आहे. असे प्रतिपादन नांदेड विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा माजी खा.डॉ. जे.एम.वाघमारे यांनी केले.

# यशवंत धाराशिव जिल्हा

शुक्रवार दि. ३१ मे २०२४




कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलचा १० वी परीक्षेत १०० टक्के




मुरुम दि.३० (प्रतिनिधी) – उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत सर्वच विद्यार्थी उतीर्ण झाले असून यामध्ये अतिफ अबीद पटेल ९१ टक्के (प्रथम), प्रणव राजेंद्र गायकवाड ९०.८० टक्के (द्वितीय), सचिन बीभिशन गडकर ८८.८० टक्के (तृतीय) क्रमांक घेवून उत्तीर्ण झाले आहेत. या यशस्वी विद्यार्थ्यांचे व सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे नगर शिक्षण विकास मंडळाचे अध्यक्ष बापूराव पाटील, माजी मंत्री बसवराज पाटील, उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील, संस्थेचे सचिव व्यंकटराव जाधव गुरुजी, सर्व संचालक मंडळ, प्रशालेच्या मुख्याध्यापिका अनुराधा जोशी, सचीदानंद अंबर, प्रा. डॉ. पुरुषोत्तम बारवकर, धनराज हाळळे, जगदीश सुरवसे सह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याकडून विशेष अभिनंदन करून कौतुक करण्यात आले.

# शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपासाठी बँकांनी गावनिहाय शिबिरांचे आयोजन करावे – डॉ. ओंबासे

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – यावर्षी चांगला पाऊस अपेक्षित आहे. बँकांनी पीक कर्ज वाटपाची गती वाढवावी. जिल्ह्यात पीक कर्ज वाटपाचे प्रमाण कमी आहे. जिल्ह्यातील कोणताही शेतकरी हा खरीप पीक कर्जापासून वंचित राहणार नाही याची दक्षता सर्व बँकांनी घ्यावी. जास्तीत जास्त शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करण्यासाठी बँकांनी गावनिहाय शिबिराचे आयोजन करून शेतकऱ्यांकडून कागदपत्राची पूर्तता करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी दि.३० मे रोजी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात खरीप हंगामच्या पीक कर्ज वाटपाचा आढावा घेताना ते होते. यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक चिन्मय दास, प्रभारी जिल्हा उपनिबंधक बालाजी काळे व बँकांचे जिल्हा समन्वयक यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ.ओंबासे म्हणाले की, सर्व बँक व्यवस्थापकांनी गावनिहाय पीक कर्जाबाबत शिबिराच्या आयोजनाची तारीख निश्चित करावी. पीक कर्जासाठी कोणकोणते कागदपत्रे लागतात त्याची पूर्तता शेतकऱ्यांकडून करून घ्यावी. त्यामुळे शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागणार नाही.बँकांनी पीक कर्ज वाटपाचे जे उद्दिष्ट दिले आहे ते पूर्ण करावे. येत्या ८ ते १० दिवसांत गावनिहाय पीक कर्ज वाटपाचे शिबिरे आयोजित करावी. शिबिराच्या आयोजनाची पूर्वकल्पना बँकांनी त्यांच्या नोटीस बोर्डवर लावावी. तसेच बँकांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या गावातील शेतकऱ्यांच्या व्हाट्सअप ग्रुपवर शिबीराच्या आयोजनाची माहिती पाठवावी. म्हणजे त्यांच्या माध्यमातून गावनिहाय आयोजित करण्यात येणाऱ्या शिबिराची माहिती जास्तीत जास्त शेतकऱ्यांना मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे शेतकरी हे गाव पातळीवर आयोजित करण्यात येणाऱ्या शिबिरामध्ये सहभागी होऊन पिक कर्ज वाटपाचा लाभ घेऊ शकतील असे त्यांनी सांगितले. बँकांनी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून पीक कर्ज वाटपाच्या दृष्टीने कारवाई करावी असे सांगून डॉ.ओंबासे म्हणाले की, बँकांनी पीक कर्ज वाटपात प्रगती करून वेळेतच शेतकऱ्यांना पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे नियोजन करावे. बँकांनी




पीक कर्ज वाटपाचा दैनंदिन अहवाल जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापकांकडे सादर करावा असे डॉ.ओंबासे यांनी सांगितले.

सन २०२४–२५ या वर्षाच्या खरीप हंगामात बँकांना १५८३ कोटी ७७ लक्ष रुपये पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. जिल्ह्यातील ४१ हजार ५२६ शेतकऱ्यांना २८ मेपर्यंत ३१३ कोटी ६० लक्ष रुपये खरीप पिक कर्ज वाटप केले असून पीक कर्ज वाटपाची टक्केवारी १९.८० इतकी असल्याची माहिती जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक दास यांनी सांगितली. या बैठकीला जिल्हातील सर्व बँकांचे जिल्हा समन्वयक आणि सर्व बँकांचे शाखा व्यवस्थापक ऑनलाईन पद्धतीने सहभागी होते.संबंधित बँकांचे जिल्हा व्यवस्थापक आणि शाखा व्यवस्थापक यांनी त्यांच्या बँक आणि शाखांकडून आतापर्यंत या खरीप हंगामात केलेल्या पीक कर्ज वाटपाची माहिती दिली.

## आर.पी. कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाला ए श्रेणी मूल्यांकन प्राप्त

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – तालुक्यातील गडदेधरी आळणी पाटी येथील डॉ. वेदप्रकाश पाटील शैक्षणिक संकुलातील आर पी. कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयाला रायगड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी लोणेरे अंतर्गत सन २०२२ – २३ या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या एकॅडमिक मॉनिटरिंग कमिटीद्वारे ए श्रेणी मूल्यांकन प्राप्त झाले आहे. महाविद्यालयातील शिक्षणाचा दर्जा सुधारावा यासाठी विद्यापीठ दरवर्षी अशी कमिटी तपासणीसाठी पाठवत असते. या कमिटीद्वारे महाविद्यालयातील सर्व मूलभूत सोयी, सुविधांची व कामाची तपासणी करण्यात आली. तपासणीतंर्गत सुविधा आणि काम समाधानकारक असल्याचे आढळून आले. तसेच महाविद्यालयामध्ये यावर्षीपासून एम.फार्मसी (केमिस्ट्री आणि फार्माकोलॉजी) या दोन शाखेची सुरुवात झाली आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.प्रतापसिंह पाटील यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गाझी शेख व इतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन व कौतुक करीत अशीच उत्तरोत्तर संस्थेची प्रगती करावी अशा शुभेच्छा दिल्या.

## आ.आव्हाड यांच्या विरोधात भाजपचे जोडे मारो आंदोलन

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – आमदार जितेंद्र आव्हाड यांनी महाडमध्ये मनुस्मृतीचे दहन करताना त्यांच्याकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो असलेले पोस्टर फाडले. त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केला असल्यामुळे त्यांच्या विरोधात कारवाई करण्यात यावी अशी मागणी भारतीय जनता युवा मोर्चाच्यावतीने करीत आव्हाड यांच्या विरोधात दि.३० मे रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर आ. आव्हाड यांच्या प्रतिमेला जोडे मारुन निषेध आंदोलन करण्यात आले. धाराशिव शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या




पुतळ्यासमोर आंदोलन करण्यात आले. यावेळी भाजपा माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष राजसिंहा राजेनिंबाळकर, किसान मोर्चा प्रदेश सचिव रामदास अण्णा कोळगे, प्र का स प्रवीण पाठक, प्रदेश उपाध्यक्ष महिला अस्मिता कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष सुनील काकडे, सरचिटणीस इंद्रजित देवकते, शहराध्यक्ष अभय इंगळे, सिधोजी राजेनिंबाळकर, एस सी मोर्चा अध्यक्ष अमोल पेठे, नरेन वाघमारे, अजित खापरे, विद्या माने, गणेश मोरे, रंजित देशमुख, अभिजीत काकडे, अमोल राजेनिंबाळकर, नाना कदम, दाजीप्पा पवार, शेषेराव उंबरे, रोहीत देशमुख, प्रमोद बचाटे, प्रसाद मुंडे, सुनिल पंगुडवाले, प्रवीण सिरसाठे, मेसा जानराव, सागर दंडनाईक, किशोर पवार, उदय बनसोडे, आनंद भालेराव, पुष्पकांत माळाळे, अतुल कावरे, दादा पवार, अरुण पेठे, संग्राम बनसोडे, नानासाहेब पाटील, शिवानी परदेशी, नवनाथ सोकर, सार्थक पाटील, कृष्णा उंबरे, प्रमोद हावळे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नुकसानीचे पंचनामे करून बाधितांना आर्थिक मदत तात्काळ द्यावी– माजी मंत्री चव्हाण

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – जिल्ह्यामध्ये अनेक भागात वादळी वारा व अवकाळी पावसाने घराचे, जनावारांच्या गोट्याचे, फळबागांचे व भाजीपाल्याचे अतोनात नुकसान झालेले आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ पचनामे करून बाधित शेतकरी कुटूंबाना निकषाच्या बाहेर जाऊन तात्काळ मदत करावी अशी मागणी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी केली.

धाराशिव तालुक्यातील सांगवी, कामेगाव, दाऊतपूर, भंडारवाडी या भागांमध्ये दौरा केल्यानंतर ते बोलत होते. यावेळी घरावरील दगड पडून मयत झालेले हणमंत अर्जुन कोळपे यांच्या कुटुंबाला भेट देऊन सांत्वन केले. तर हृदय विकाराने मृत्यू पावलेल्या विक्रम पाटील यांच्या कुटुंबालाही भेट दिली. तसेच संपूर्ण घरावरील पत्रे उडून गेलेल्या बाळासाहेब क्षीरसागर यांच्या घराची पाहणी केली. तर सिंदफळ येथील रवी कापसे यांच्या पडलेल्या केळी बागेची पहाणी केली.

यावेळी बोलताना चव्हाण म्हणाले की, खरीप व रब्बी हंगाम दुष्काळी परिस्थितीमुळे वाया गेल्याने शेतकरी अत्यंत अडचणीत आहे. त्यातच वादळी वारे व अवकाळी पावसाने झालेले नुकसानही मोठ्या प्रमाणात आहे. एवढे नुकसान होऊनही विमा कंपन्यानी अपेक्षित नुकसान भरपाई दिलेली



नाही. बँकाचे कर्जाचे पुनरगठन होत नसल्यामुळे शेतकऱ्यांना खरीप पेरणीसाठी पैसे नाहीत. त्यामुळे शासनाने निकष बाजूला ठेवून मदत करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच या वादळी वाऱ्याने महावितरणचे पोल मोठ्या प्रमाणात पडलेले आहेत. त्यामुळे अजूनही वीज पुरवठा सुरळीत झाला नसल्याने पाणी पुरवठ्यावर परिणाम होत आहे. त्यामुळे महावितरणने युद्ध पातळीवर काम करण्याची गरज आहे. यावेळी त्यांच्या समवेत काँग्रेसचे जिल्हा संघटक राजाभाऊ शेरखाने, जिल्हा सरचिटणीस अशोक बनसोडे, सुभाष हिंगमिरे, अमोल पाटील, अशोक शिंदे, बाबासाहेब जाधव, रवी कापसे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिवराज्याभिषेक सोहळ्या संदर्भात बैठकीस प्रतिसाद



धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्यावतीने युगनिर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५१ व्या शिवराज्याभिषेक महोत्सव रायगडावर साजरा करण्याचे नियोजन दूर्गराज रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या दिमाखात साजरा करण्यासाठी नियोजन करण्यात आलेले आहे. रायगडावर साजऱ्या होणाऱ्या या शिवराज्याभिषेक सोहळा नियोजनासाठी धाराशिव यांच्याकडे स्वच्छता कमिटी, भोजन कमिटी व नियोजन कमिटी यांच्याकडे देण्यात आलेले आहे. यासाठी शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे स्वयंसेवक दि.२ जून रोजी रायगडाकडे रवाना होणार आहेत.

यावेळी अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष शशिकांत खुने यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे अध्यक्ष गौरव बागल, उपाध्यक्ष आकाश कोकाटे, सचिव अमोल पवार, शहराध्यक्ष मंगेश निंबाळकर, उपाध्यक्ष आकाश भोसले, सचिव शुभम लोकरे, तालुकाध्यक्ष अमोल सिरसट, उपाध्यक्ष वेंकट कोळी, सचिव दत्तात्रय जावळे, रिक्षा समितीचे अध्यक्ष मनोज जाधव, उपाध्यक्ष अजिंक्य तनमोर, सचिव योगेश आतकरे, धनंजय साळुंके, दत्ता साळुंके, सुनील मिसाळ, बालाजी खोचरे, गणेश पवार, अतुल मते, विनोद चोबे, बालाजी पवार आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने आ. आव्हाड यांचा केला निषेध

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – आमदार जितेंद्र आव्हाड यांनी भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा फाडून डॉ आंबेडकर यांचा अवमान केला आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने आ आव्हाड यांच्या विरोधात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर घोषणाबाजी करीत आ आव्हाड यांना अटक करण्यात यावी अशी मागणी करीत दि.३० मे रोजी आंदोलन करीत निषेध केला.

महाड येथे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी महामानव विश्वभूषण भारतीय संविधान घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा असलेला पोस्टर फाडला आहे. त्यामुळे संपूर्ण भारतातील दलित अनुयायांचा अपमान केला असून दलित समाजाच्या भावना दुखावल्या असून त्यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करण्यात यावी अशी मागणी केली आहे. तसेच आ जितेंद्र आव्हाड यांनी केलेले कृत्य निंदनीय आहे. त्यामुळे त्यांच्या विरुद्ध एससी, एसटी ॲक्ट प्रमाणे दलित समाजाच्या भावना दुखावणे, अपमान करणे, समाजामध्ये अशांतता निर्माण करणे, समाजामध्ये जातीय तेढ निर्माण करणे या कायद्यानुसार गुन्हा दाखल करून अटक करावी.

यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष समियोद्दिन मशायक, शहराध्यक्ष सचिन तावडे, धाराशिव कळंब विधानसभा अध्यक्ष मोहन मुंडे, सोशल मीडिया प्रदेश उपाध्यक्ष लतीफ पटेल, सा.न्याय विभाग जिल्हाध्यक्ष अतुल जगताप,




अल्पसंख्याक विभाग जिल्हाध्यक्ष असद खान पठाण, माजी सैनिक विभाग जिल्हाध्यक्ष मच्छिंद्र क्षीरसागर, विद्यार्थी जिल्हा कार्याध्यक्ष प्रतीक माने, सा.न्याय जिल्हा सरचिटणीस राजाभाऊ जानराव, आदिवासी सेल वाशी तालुकाध्यक्ष विशाल काळे, धाराशिव युवक तालुका कार्याध्यक्ष वैभव मोरे, धाराशिव युवक शहराध्यक्ष निहाल शेख, युवक शहर कार्याध्यक्ष संदीप बनसोडे, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष अरफात काझी, कामगार आघाडी शहराध्यक्ष प्रमोद हावळे, सौरभ देशमुख, शिरसाट प्रदीप, नाना शिंदे आदी उपस्थित होते.

# गौंडगांव येथील दलित वस्ती विकास कामांमध्ये भ्रष्टाचार करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – तालुक्यातील गौडगाव ग्रामपंचायत कार्यालयांतर्गत करण्यात आलेल्या दलित वस्ती सुधार योजना व इतर विविध विकास योजनेच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळा व भ्रष्टाचार केला आहे. त्यामुळे संबंधित घोटाळा व भ्रष्टाचार करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी दलित बांधवांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे एका निवेदनाद्वारे दि.३० मे रोजी केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, धाराशिव तालुक्यातील गौडगाव ग्रामपंचायत कार्यालयांतर्गत दलित वस्तीमध्ये सुधार योजना व गाव सुधारणा करण्यासाठी विविध विकास कामे करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झालेला आहे. यामध्ये दलित वस्तीमध्ये सुधार योजने अंतर्गत कामामध्ये घोळ, दलित वस्तीमध्ये पाणी पुरवठा व गावातील नळ योजना कामांमध्ये घोटाळा, आर.ओ. प्लॅन्टमध्ये जमा होणाऱ्या पैशाचे कुठलेही रेकॉर्ड नाही. त्यामुळे या प्लॅन्टमधील मिळणाऱ्या पैशामध्ये गैरव्यवहार झालेला दिसून येत आहे. तसेच दलित वस्तीमध्ये सांड पाण्याची उपाययोजना अद्यापपर्यंत राबवलेली नाही.

त्यामुळे गावातील दुषित सांडपाणी घरामध्ये शिरत आहे. तर दलित वस्तीमध्ये सिमेंट कॉंक्रीट रोडचे केलेले काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे. तसेच मनरेगा रोजगार हमी योजने अंतर्गत गावातील दलित बांधवांची कामासाठी मिळणे आवश्यक होते. मात्र तसे न करता बोगस लोकांची नावे नोंद करून आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. विशेष म्हणजे गावातील नदीचा कोल्हापुर बंधारा गायब करून नदीचा प्रवाह बदलून आजुबाजुच्या शेतकऱ्यांनी अतिक्रमण करून स्मशानभुमिवर दलितांची हेळसांड केली आहे. तर ग्रामपंचायमधील जुने रेकॉर्ड गायब केले आहे. यामध्ये जि. प. शाळेची महत्वाची कागदपत्रे, सिंचन विहीरीबाबतचे कागदपत्रे, सभागृहाची कागदपत्रे यांचा समावेश आहे. तर सामाजिक सभागृहामध्ये इतर धर्मियांना येण्यास मज्जाव करून गावामध्ये धार्मिक संघर्ष पेटवण्याचे काम ग्रामपंचायत कार्यालयाने केले आहे. तसेच मुस्लिम दफनभुमीचे संरक्षण भिंत ग्रामपंचायतच्या गहाळ कारभारामुळे पडली तर गावातील व्यायाम शाळा बंद करून तेथे राहण्यासाठी वापर केला जात आहे. दलित वस्तीमधील शासकीय बोअरवेलमधील पाण्याची मोटार, वायर ग्रामपंचायत कार्यालयाने गहाळ केल्यामुळे दलित वस्तीमधील लोकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे या घोटाळा व भ्रष्टाचार करणाऱ्या संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी




केली आहे. या निवेदनावर भाई फुलचंद गायकवाड, राजाभाऊ हुंबे, बापू कदम, दत्तात्रय माळदकर, सिद्धार्थ हुंबे, शीतल हुंबे, माजिद मुजावर, फयाज शेख, दगडू पठाण, अनंत हुंबे, साहेबराव आगळे, मुबारक अंदुरकर, शोएब शेख, रिफोज पठाण, दत्तात्रय हुंबे, समीर हुंबे, बाळासाहेब हुंबे, काकासाहेब आगळे, ज्योती आगळे, शकिला अंदुरकर, रेश्मा अंदुरकर, हसिना पटेल, वजीर पटेल, संकेत हुंबे, लहु हुंबे, लक्ष्मी हुंबे, मालीनी हुंबे, आशाबाई हुंबे, वहिदा पटेल, रहेमान पठाण, अतिक पठाण, निलोफर पठाण, लताबाई कदम, ईलाही शेख, रफिक पठाण, आरबाज पटेल, जावेद पटेल, युनूस पटेल, रमेश माळी, श्रीकांत माळी व अकबर पटेल आदींसह इतरांच्या सह्या आहेत.

# संपादकीय

## सार्वजनिक शौचालये, सेवा-सुविधांचा बोजवारा

मुंबई शहराची आंतरराष्ट्रीय शहरामध्ये गणना केली जाते. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबापुरीत नागरी सुविधांमध्ये सातत्याने वाढ होत असली तरीही मूलभूत सुविधांची पूर्तता करण्यास प्रशासन कुठे मागे पडले का? असा प्रश्न आता निर्माण झालेला आहे. शहरात सार्वजनिक शौचालयांची समस्या नागरिकांना भेडसावत आहे. त्यात महिला वर्गाला त्याचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. मुंबईत दर ४ शौचकुपांमागे केवळ १ शौचकुपाचा वापर महिलांकडून केला जात आहे. सर्वेक्षणानुसार एका सार्वजनिक शौचालयाचा वापर करणाऱ्या पुरुषांची संख्या ७५२, तर स्त्रियांची संख्या १८२० आहे. शहरात मोठ्या प्रमाणात राहणाऱ्या झोपडपट्टीवासीयांच्या संख्येच्या तुलनेने सार्वजनिक शौचालये अपुरी आहेत, असा दावा प्रजा फाऊंडेशनने केला आहे. सार्वजनिक शौचालयांमध्ये पाणी आणि विजेची सोय असणे अपरिहार्य असते. मात्र अनेक ठिकाणी मूलभूत सुविधांची वानवा आहे.

मुंबईतील ६९ टक्के सार्वजनिक शौचालयांमध्ये पाण्याची जोडणी करण्यात आलेली नाही. तसेच ६० टक्के शौचालयांमध्ये वीज उपलब्ध नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होते, ही धक्कादायक बाब अहवालातून स्पष्ट झाली आहे. प्रजा फाऊंडेशनच्या वतीने स्वच्छता आणि वायुप्रदूषणाच्या समस्यांबाबत मुंबईकर आणि प्रशासनाचे लक्ष वेधण्याच्या हेतूने मुंबईतील नागरी समस्यांची सद्यस्थिती दर्शविणारा अहवाल दरवर्षी जाहीर केला जातो. यंदाच्या अहवालातून शौचालयांच्या समस्येचे गंभीर स्वरूप समोर आले आहे. मुंबईसारख्या शहरात सार्वजनिक शौचालये किती व कशी असावीत, याचे मापदंड स्वच्छ भारत'अभियानातून देण्यात आले असले तरीही अजूनही सार्वजनिक शौचालयांची स्थिती दयनीय आहे, हे वास्तव या अहवालातून पुढे आले आहे.

भारत सरकारच्या अत्यंत प्रतिष्ठेच्या स्वच्छ भारत' कार्यक्रमाअंतर्गत दहा लाख शौचालये बांधण्याचा निर्णय केंद्र सरकारने पहिल्या कार्यकाळात म्हणजे सन २०१९ आधी घेतला होता. त्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी स्वत: पंतप्रधानांनी जातीने लक्ष दिले. देशातील विशेषत: ग्रामीण भागातील ९० टक्क्यांपेक्षा जास्त लोकांना ही सुविधा मिळाली आहे, असा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला होता. प्रत्येक घरात स्वच्छतागृहाची सोय करणे आणि तसेच शहरातील घनकचरा व्यवस्थापन आणि शहरात उघड्यावर प्रातर्विधी रोखणे हे उद्दिष्टे ठेवत स्वच्छ' भारत अभियान देशभर प्रभावीपणे राबविण्यात आले. दुसऱ्या बाजूला मुंबई शहराचा विचार केला, तर गेल्या दहा वर्षांमध्ये शौचालयासंदर्भातील तक्रारींमध्ये तब्बल ११२ टक्क्यांनी वाढ झालेली दिसली. वर्ष २०१४ मधील शौचालयासंदर्भातील २५७ तक्रारींचा आकडा २०२३ मध्ये ५४४ वर पोहोचला आहे, असाही दावा प्रजा फाऊंडेशनने केला आहे. मुंबईसारख्या महानगरात सार्वजनिक शौचालयांची इतकी बिकट अवस्था पाहून मन विषण्ण झाल्याशिवाय राहत आहे. नागरी सुविधा पुरविणे हे सरकारच्या अधिपत्याखाली काम करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे काम आहे. पाणी, शौचालय, रस्ते या नागरी सुविधा देण्याचे काम हे प्रशासनाचे आहेच. तसेच स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देणे आणि प्रदूषण आटोक्यात आणणे ही मुंबई महानगरपालिकेची जबाबदारी आहे. प्रजा फाऊंडेशनच्या अहवालामुळे प्रशासन आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये कोणताही दुवा नसल्यामुळे ही बिकट अवस्था निर्माण झाली का? असा प्रश्न निर्माण होतो. गेली दोन वर्षं महापालिका बरखास्त आहे. त्यामुळे प्रशासनाच्या हाती कारभार येण्याआधी स्थानिक नगरसेवकांच्या निधीतून सार्वजनिक शौचालय उभारणीची कामे केली जात होती. ती सर्व कामे आता खोळंबली आहेत.

नागरिकांच्या समस्यांची लोकप्रतिनिधींना अधिक माहिती असते. पालिकेत लोकप्रतिनिधी नसल्याने नागरिकांच्या प्रश्नांबाबत चर्चा आणि उपाययोजना होत नाहीत. त्यामुळे शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्रभावी व लोकशाही पद्धतीने सक्रिय व्हावे, यासाठी राज्य शासनाचे धोरण व कृती स्पष्ट असणे आवश्यक आहे. समस्या डोळ्यांसमोर दिसत आहेत; परंतु दाद कोणाकडे मागायची हा प्रश्न नागरिकांना सतावतोय. खासगी संस्थांना शौचालये चालवायला दिली आहेत त्याची अवस्था काही प्रमाणात ठीक आहे; परंतु महापालिकेच्या वतीने बांधण्यात आलेल्या सार्वजनिक शौचालयांची स्थिती ही नरकयातना देणारी वाटते. सरकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी हे लालफितीतील कारभाराप्रमाणे काम करत असल्याने, नागरिकांची गाऱ्हाणे ऐकायला कोणाला वेळ नसावा. मुंबईसारख्या शहरात शौचालयाबाबत ही अवस्था असेल, तर महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील शहरात काय अवस्था असेल, याची कल्पना न केलेली बरी.सध्या शहराच्या लोकसंख्येने दीड कोटींवर आकडा पार केलेला आहे. शिक्षण व उदरनिर्वाहासाठी दररोज प्रवास करणाऱ्यांची संख्या ८० लाखांहून अधिक आहे. शहरातील स्वच्छता व आरोग्य स्थितीची तपासणी वार्षिक स्वच्छता सर्वेक्षणातून घेतली जाते. मात्र शौचालयांच्या बाबतीत मुंबईची श्रेणी मोठ्या प्रमाणात खालावली आहे. पुरुषांच्या तुलनेत महिलांसाठी पुरेशी शौचालये नाहीत. महाराष्ट्रातील शहरांमध्ये मुंबईची श्रेणी ३७, तर देशातील शहरांमध्ये मुंबईची श्रेणी अधिक घसरून १८९ झाली आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईची स्थिती काळजी करण्यासारखी आहे. त्यामुळे याची कारणे शोधून उपायोजना करणे आवश्यक आहे.

# तुम्हालाही आवडतात का लांब पापण्या?



प्रत्येक स्त्रीला लांब आणि जाड पापण्या असाव्यात असे वाटत असते. लांब आणि चमकणाऱ्या पापण्या तुमच्या चेहऱ्याला एक वेगळंच आकर्षण देतात. यामुळेच आजकाल स्त्रिया लग्न किंवा मोठ्या समारंभाला जाण्यापूर्वी डोळे अधिक आकर्षक बनवण्यासाठी बनावट पापण्यांचा अवलंब करत आहेत. आजकाल अनेक कृत्रिम उपचार आहेत. ज्याद्वारे पापण्या लांब आणि जाड केल्या जातात. मात्र हे सर्व प्रकारचे उपचार फार काळ टिकत नाहीत, तसंच काहीवेळा त्यांचे डोळ्यांवर दुष्परिणामही झालेले दिसून आले आहेत. अशा परिस्थितीत जर तुम्हालाही तुमच्या पापण्या जाड आणि लांब करायच्या असतील, तर या लेखात आम्ही तुम्हाला काही प्रभावी उपाय सांगणार आहेत. या पद्धतींच्या मदतीने तुम्ही तुमचे लांब पापण्यांचे स्वप्न कोणत्याही दुष्परिणामांशिवाय अगदी सहजपणे पूर्ण करू शकाल.

ग्रीन टी चमत्कार करेल : स्टाइलक्रेसच्या मते ग्रीन टीमध्ये पॉलिफेनॉल भरपूर प्रमाणात असतं, जे केसांच्या वाढीसाठी प्रभावी ठरतं. यासाठी रात्री झोपण्यापूर्वी ग्रीन टी थंड करून बोटांनं पापण्यांवर लावा. असं नियमित केल्यानं तुमच्या पापण्या काही वेळातच लांब आणि जाड होतील. याशिवाय तुम्ही ग्रीन टीचं सेवन करू शकता. याच्या मदतीनं पापण्यांसोबतच तुमच्या डोक्याचे केस वाढवण्यासाठी ते प्रभावी ठरेल.

एरंडेल तेल उपयुक्त : पापण्यांच्या वाढीसाठी एरंडेल तेल हा सर्वोत्तम पर्याय मानला जातो. एरंडेल तेलामध्ये रिसिनोलिक ऍसिड असतं. त्यामध्ये दाहक-विरोधी आणि बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा गुणधर्म असतो. हे पापण्यांच्या फोलिकल्सचे पोषण करण्याचे काम करतात. याशिवाय व्हिटॅमिन ई, ओमेगा-६ फॅटी ऍसिड सारखे इतर अनेक पोषक घटक देखील एरंडेल तेलात भरपूर प्रमाणात आढळतात. ते पापण्यांच्या वाढीसाठी प्रभावी ठरतात. यासाठी तुम्ही कापसावर थोडंसं एरंडेल तेल घेऊ शकता किंवा बोटांच्या मदतीने डोळ्यांना लावू शकता.

ऑलिव्ह तेल देखील प्रभावी : ऑलिव्ह ऑइलमध्ये फिनोलिक संयुगे भरपूर प्रमाणात असतात. याच्या मदतीने पापण्या लांब आणि जाड करता येतात. झोपण्यापूर्वी पापण्यांवर ऑलिव्ह ऑईल लावू शकता. काही दिवसातच तुम्हाला त्याचा अप्रतिम प्रभाव दिसेल.

कोरफड जेल आणि व्हिटॅमिन ई : एलोवेरा जेलमध्ये व्हिटॅमिन ई तेल मिसळल्याने तुमच्या पापण्यांचे केस दाट होतील. एलोवेरा जेल तुमच्या पापण्यांना मऊ करते, तर व्हिटॅमिन ई केस गळण्याची समस्या टाळण्याचे काम करते. अशा स्थितीत पापण्यांच्या वाढीसाठी हे दोन्ही गुणकारी मानले जातात.

खोबरेल तेल : खोबरेल तेलामध्ये लॉरिक ॲसिड जास्त प्रमाणात आढळतं. ते पापण्यांचे पोषण करण्याचे काम करते. याव्यतिरिक्त नारळाच्या तेलामध्ये मॉइश्चरायझिंग गुणधर्म असतात जे पापण्यांचे तुटणे टाळू शकतात तसंच निरोगी केसांच्या वाढीस प्रोत्साहन देतात. तुम्ही कापसाच्या बोळ्यानं पापण्यांवर तेल लावू शकता. तेल रात्रभर राहू द्या आणि सकाळी स्वच्छ धुवा. यामुळे तुमच्या पापण्याही लांब आणि जाड होतील.

# द्राक्ष उत्पादनात ऐंशी टक्के घट



सध्या देशात तपमानात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. वाढते तपमान सर्वच गोष्टींसाठी धोकादायक आहे. मानवी आरोग्यासह शेती पिकांनादेखील या वाढत्या तपमानाचा फटका बसत आहे. सध्या वाढत्या तपमानामुळे द्राक्ष उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. विशेषत: तामिळनाडू राज्यातील द्राक्ष उत्पादकांना तपमानवाढीचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. जवळपास ८० टक्क्यांहून अधिक द्राक्ष उत्पादन घटण्याची शक्यता आहे.तमिळनाडू राज्यात वाढत्या तपमानामुळे द्राक्ष उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. या वर्षी उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राज्यात पन्नीर थिराचाई आणि ओडैपट्टी सीडलेस द्राक्षे या द्राक्षाच्या दोन मुख्य जाती आहेत. साधारणपणे एका एकरात १०-१२ टन द्राक्षाचे उत्पादन अपेक्षित असते; मात्र या वेळी तपमान जवळपास ३९ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त राहिल्याने एकरी उत्पादन तीन टनांपेक्षा कमी होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. म्हणजे ८० टक्क्यांनी उत्पादन घटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार एक एकर द्राक्ष बागेला साधारणत: एक लाख २५ हजार रुपयांचा खर्च करावा लागतो. उत्पादनात मोठी घट आली तर शेतकऱ्यांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. उष्णतेची लाट आल्यामुळे सर्वच शेतकरी चिंतेत आहेत. दरम्यान, पिकांचे नुकसान होत असताना राज्य सरकारने ऊस आणि धानासाठी केली होती, तशी मदतीची तरतूद द्राक्ष पिकासाठी करावी आणि किमान आधारभूत दर ५० रुपये प्रति किलो असावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# गहू खरेदीचा विक्रम यंदा मोडणार




सध्या सरकारकडून मोठ्या प्रमाणात गव्हाची खरेदी सुरू आहे. यामुळे सरकारतर्फे होणाऱ्या गहूखरेदीचा गेल्या वर्षीचा विक्रम मोडला जाण्याची शक्यता आहे. सध्या गव्हाची खरेदी दोन कोटी ६१ लाख टनांच्या जवळपास आहे. ही खरेदी दोन कोटी ७० लाख टनांपर्यंत पोहोचेल, असा विश्वास अन्नधान्य महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.सरकार यंदा मागील वर्षीच्या गहूखरेदीचा विक्रम मोडण्याची शक्यता दाट आहे. कारण अद्याप अनेक राज्यांमध्ये सरकारकडून गव्हाची खरेदी सुरू आहे. मध्य प्रदेशने गहू खरेदीचा कालावधी ३१ मेपर्यंत वाढवला आहे. पंजाब आणि हरयानामध्ये आत्तापर्यंत जास्त गव्हाची खरेदी केली आहे. उत्तर प्रदेशमध्येही गहू खरेदीला मोठ्या प्रमाणात चालना देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार पंजाबमध्ये एक कोटी २४ लाख टन तर हरयानामध्ये ७१ लाख ४० हजार टन गव्हाची खरेदी झाली आहे.फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया'च्या अधिकाऱ्यांना दिलेल्या माहितीनुसार, एकूण गव्हाची खरेदी ही दोन कोटी ७० लाख टनांपर्यंत पोहोचेल, असा अंदाज आहे. प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना आणि इतर कल्याणकारी योजनांतर्गत ८० कोटी गरिबांना मोफत अन्नधान्य पुरवण्याच्या अन्नसुरक्षेची गरज पूर्ण करण्यासाठी सध्याची खरेदीची पातळी आणि कॉर्पोरेशनकडे असलेला साठा पुरेसा असेल. आमच्याकडे बाजारासाठी चांगला साठा असेल. गरज पडल्यास किमती तपासण्यासाठी हस्तक्षेप केला जाईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.समोर आलेल्या तपशिलानुसार मध्य प्रदेशमधील गव्हाची खरेदी कमी झाली असून उत्तर प्रदेश आणि राजस्थानमधील खरेदीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. सध्याची खरेदीची पातळी पाहता सरकार या वर्षी गव्हाच्या निर्यातीवरील निर्बंध उठवेल, अशी शक्यता नाही. मिळालेल्या माहितीनुसार पंजाब आणि हरियाणा ही गहू खरेदीमध्ये आघाडीवर असलेली राज्ये आहेत. या दोन्ही राज्यांमध्ये गव्हाची मोठ्या प्रमाणात खरेदी झालेली दिसत आहे.

# प्रा. डॉ. निलांबिका हुनगुंद [बडीहवेली] [सेवानिवृत्तीनिमित्त]



प्रत्येक स्त्री-पुरूषांच्या लग्नाच्या मरेशीमगाठीफ स्वर्गातच बांधलेल्या असतात व योग्य वेळी त्या जुळुनि येतात अशीच सर्वांची भावना असते.

श्री हावगीस्वामी महाविद्यालय उदगीर येथील गणिताच्या आधिव्याख्यात्या डॉ. निलांबिका (आई गंगम्मा) सोमशेखरप्पा हुनगुंद (बडीहवेली) यांच्याबाबतीत असाच योगायोग आहे असे मला वाटते.

प्रा. डॉ. निलांबिका मॅडम मूळच्या कर्नाटकातील हुबळी येथील. आई-वडील, काका-काकू, आत्या, बहिणी-भावंडे मिळून तीस सदस्य असलेल्या एकत्रित कुटूंबातल्या. त्यांचे शिक्षण हुबळी येथेच एम.एस्सी. मॅथ्स पर्यंत झाले. त्यांच्या लग्नाची मरेशीमगाठफ उदगीर मधील सुप्रसिध्द व्यापारी कै. काशीनाथप्पा बडीहवेली यांचे सुपुत्र प्रा. सुभाष बडीहवेली यांच्याशी जुळली. बडीहवेली परिवार देखील उदगीर मधील एक नामांकित व एकत्रित कुटूंब असलेला मोठा परिवार. हुबळी-उदगीर हे अंतर जवळपास ५५० कि.मी. व दोन्हींची राज्ये वेगवेगळी. म्हणून हा एक योगायोगच म्हणावा लागेल.


लग्नानंतर डॉ. निलांबिका मॅडम बडीहवेली परिवाराशी लवकरच एकरूप झाल्या. आपल्या प्रेमळ स्वभावामुळे, सर्वच नात्यांना त्यांनी योग्य सन्मान व न्याय दिले. एक सून म्हणून, सुविध पत्नी म्हणून, दोन मुलींची आई म्हणून, भावजय, नणंद, जाऊबाई भाच्चे-भाच्ची, काकू इत्यादी अशी कितीतरी नाती अतिशय आदरपणे व मायाळूपणे आजही त्या सांभाळत आहेत. संपूर्ण बडीहवेली परिवार, नातलग व आप्तेष्ठ यांच्यासाठी त्या मसेंटर पॉईंटफ असतात. सर्वजण देखील त्यांचा योग्य तो मान सन्मान राखतात. त्यांच्या दोन्ही मुलींची लग्न झालेली असून दोघींच्याही सासरकडील नात्यांचा संपूर्ण बडीहवेली परिवाराकडून आदरपूर्वक मान-सन्मान ठेवला जातो. स्वतःचे माहेर व सासर या दोन्हीकडे त्यांचे समान लक्ष असते.

लग्नानंतर डॉ. निलांबिका मॅडम कांही दिवसांनी उदगीरच्या श्री. हावगीस्वामी वरिष्ठ महाविद्यालयात गणित या विषयात अधिव्याख्यात्या म्हणून रूजू झाल्या. कौटूंबिक जबाबदारी सांभाळत व स्वतःचे मअॅकॅडमिक करिअरफ वाढवित त्यांनी महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी अनेक अभ्यासक्रमपुरक व अभ्यासेत्तर उपक्रम राबविले. सुरपूर (गुलबर्गा) येथील प्राचार्य डॉ. डी. जी. अक्का यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पी. एच्डी. पदवी संपादन केली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी मपझल्स टु पझल यूफ हा उपक्रम नियमितपणे राबविला जात असे. मर्मॅथेर्मॅटिकल सॉफ्टवेअर मॅटलॅब फॉर टिचर्सफ या विषयावर दोन दिवसांचे वर्कशॉप महाविद्यालयात घेतले. गणितामधील मरामानुजन कॉम्पिटिशन ऑफ मॅथेमॅटिक्स नॉलेजफ ही लेखीस्पर्धा आयोजित केली. महाविद्यालयातील मआयक्केक (खट-उ) चे को-ऑर्डिनेटर म्हणून जवाबदारी त्यांनी यशस्वीपणे पार पाडली. गणित या विषयात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक कॉन्फरन्सेसमध्ये पेपर्स सादर केले. महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्रसेनेत (छडड) कार्यक्रमाधिकारी म्हणून काम पाहिले, तसेच महिला सबलीकरण समितीमध्ये देखील त्यांनी काम केले. स्वा.रा.तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत मर्मॅथेमॅटिक्स बोर्ड ऑफ स्टडीज्फ च्या सभासद म्हणून त्यांनी यशस्वीपणे काम केले. मराठवाडा मॅथेमॅटिकल सोसायटी छत्रपती संभाजीनगर, इंडियन सायन्स कॉंग्रेस कोलकता, इंडियन मॅथेमॅटिकल असोसिएशन अशा अनेक संघटनेच्या त्या क्रियाशील सभासद आहेत.

डॉ. निलांबिका मॅडम यांचा उदगीर मधील अनेक सामाजिक संघटनांशी सतत संपर्क असतो. मराठी विज्ञान परिषद, वीरशैव लिंगायत समाज, रोटरी क्लब अशा अनेक संघटनांमार्फत त्यांचे समाजकार्य सतत चालूच असते. गरजू रूग्णांसाठी त्यांनी वेळोवेळी रक्तदान केले आहे. रोटरी क्लब उदगीरतर्फे त्यांना नुकतेच मआदर्श महिलाफ म्हणून सन्मानित करण्यात आले. घरी आलेल्या पाहुण्यांचा व आमच्यासारख्या अनेक मित्रपरिवारांचा त्यांच्या कडून चहा, फराळ, जेवण देऊन आनंदाने आदरातिथ्य केले जाते. मॅडमचा नेहमीच हसतमुख चेहरा, प्रेरणादायी उंचेपूरे प्रसन्नचित्त व तेजः पूंज व्यक्तिमत्व, नेहमीच मटेन्शनफ्रीफ, वागणे सतत कार्यमग्न असणे यामुळेच त्यांच्या उच्च विचारसरणीची आम्हास नेहमीच प्रचिती येते. त्यांच्या चेहऱ्यावर थकवा, कंटाळा, नव्र्हसनेस कधीच आम्हास दिसत नाही. असेच त्यांचे प्रसन्नचित्त व्यक्तिमत्व भविष्यात देखील राहील अशी सदिच्छा व्यक्त करतो. आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर डॉ. निलांबिका मॅडम ३१ मे २०२४ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या कौटूंबिक, शैक्षणिक व सामाजिक कार्याचे कौतुक करण्यासाठीच हा लेख सादर करीत आहे.

प्रा. रमाकांत मध्वरे उदगीर
९४२१४५१७९६

# राशी भविष्य



३१ मे २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
आधिकारी लोक आपल्याला सहकार्य करतील. व्यापार वाढण्यासाठी अधिक प्रयत्न करावे लागतील. शुभ कामासाठी पैसा खर्च होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. सामाजिक कार्य कराल.

वृषभ : शुभ रंग :पांढरा,शुभ दिशा:उत्तर
सामाजिक कामात सक्रीय राहताल. चांगल्या बातम्या ऐकण्यास मिळतील. आर्थिक स्थिती चांगली राहील. काम वेळेवर पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका.

मिथुन : शुभ रंग:निळा, शुभ दिशा: पूर्व
प्रवास कष्टदायक राहील त्यामुळे तो टाळावा. प्रत्येक कामात सावधानी बाळगावी. वातावरण अनकूल असले तरी कामे होणार नाहीत. पत्नीकडून आश्वासन मिळेल.

कर्क : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: उत्तर
आपल्या प्रयत्नामुळे मोठी समस्या दूर होईल. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे. आर्थिक स्थिती संतोषकारक राहील. कुटुंबात खुशीचे व उत्साहाचे वातावरण राहील.

सिंह : शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा :दक्षिण
आपल्या मनमिळावू स्वभावामुळे आपल्या कुटुंबाचा समाजात आदर निर्माण होईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

कन्या : शुभ रंग: काळा, शुभ दिशा:पूर्व
चांगल्या दिवसाचा पुरेपूर फायदा घ्या. महत्वाची कामे वेळेवर करू शकाल. भौतिक सुविधा प्राप्त होतील. नकारात्मक विचारापासून लांब रहा. मुलांची स्थिती चांगली राहील.

तुळ : शुभ रंग:लाल,शुभ दिशा: पश्चिम
नवीन संबधाबाबत सत रहा. व्यापारात चढ उतार येतील. कौटुंबिक वातावरण तणावग्रस्त राहील. कायदेशीर समस्या सतावतील. उत्पन्न व खर्च सारखा राहील.

वृश्चिक : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम
जीवनसाथीशी संबंध दृढ होतील. परोपकारामुळे संतोष वाटेल. व्यापार रोजगार चांगला चालेल. खाण्यापिण्याकडे लक्ष द्या. रचनात्मक कामे पार पडतील.

धनु: शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: दक्षिण
चांगल्या व उत्साही मित्राचा सहवास फायदेशीर राहील. व्यवसायात उन्नतीचे योग आहे. आकर्षक प्रस्ताव मिळेल. प्रवास सुखकारक होईल.

मकर : शुभ रंग:भूरकट, शुभ दिशा:दक्षिण
राजकीय कामात यश मिळण्याचे योग आहेत. चांगल्या कामासाठी पैसा खर्च होईल.व्यापार नौकरीत आपला सल्ला मानला जाईल. भावुकतेला महत्व देऊ नका.

कुंभ : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण
कौटुंबिक जीवनात सुख समृध्दीची वाढ होईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. सत्कार्याची रूची वाढेल. आळस करू नका. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

मीन : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम
योजनेमध्ये यश मिळणार आहे. पराक्रमात वाढ होईल. व्यापारातील स्थिती आशादायक राहील. वेळेचा सदुपयोग करा. खर्च कमी करण्याकडे लक्ष द्या.

३१ मे ला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर गुरू, सुर्य, बुध व हर्षलचा प्रभाव आहे. तुमची ग्रहणशक्ती चांगली आहे. कुठल्याही विषयाचे आकलन तुम्हाला चटकन होऊ शकते. पण त्याच विषयात आणखी काय संशोधन प्रगती होऊ शकते याचे तुम्हाला कुतूहल असते. भविष्याचा वेध घेण्याचा तुमचा प्रयत्न असतो. जगाच्या तुम्ही नेहमीच एक पाऊल पुढे असता. तुमच्या धक्कादायक विचारसरणीने लोक संभ्रमित होतात. जुन्या परंपरा रूढी तुम्हाला जाचक वाटतात. तुमच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाला त्या मारक आहेत असे तुम्हाला वाटते. एकदा घेतलेल्या निर्णयात सतत फेरबदल करणे चांगले नाही. नाहीतर लोक तुमच्याकडे अविश्वासाने बघतील. तुमच्यावर जबाबदारी सोपविण्यासाठी तुम्हीही विश्वासार्ह असले पाहिजे. मनावर आघात झाल्याने अपस्मार, मज्जातंतूंची दुखणी उद्भवतील. चढउतार सहन करण्यासाठी स्थितप्रज्ञतेचा अभ्यास करा.

कार्यक्षेत्र : सतत नवे विचार मनात उद्भवत असल्याने व त्यांचा पडताळा पाहण्याकडे तुमचा कल असल्याने व कुठल्याही क्षेत्रात संशोधनात्मक कार्य करणे तुम्हाला श्रेयस्कर ठरेल. भौतिकी व खगोलभौतिकी, रसायने, औषधीविज्ञानातील नव्या शोधांची उपयुक्तता, अंतराळ विज्ञान, उपग्रहाद्वारे संदेशांचे दळणवळण, अणुऊर्जा, इंटरनेट यासारख्या विषयात आपल्या प्रतिभेने तुम्ही उंच झेप घ्याल.

प्रणयी जीवन : तुमच्या मनातले विचार कधी बदलतील हे सांगता येत नसल्याने एकाच व्यक्तीच्या प्रेमात गुंतून राहणे तुम्हाला कठीण जाते. प्रत्येक प्रेमाची नवी नवलाई तुमच्या बाजूने लवकर ओसरून जाते. तुमच्या प्रतिभेवर मात्र अनेक व्यक्ती फिदा होतात. त्यापैकी नोव्हेंबर २३ ते डिसेंबर २० दरम्यान जन्मलेल्या व्यक्तींशी नाते जुळवा.

वर्षफळ : बाहेरगाची बदली होईल वा कामानिमित्त बाहेरगावी राहावे लागेल. अस्थिरतेची टांगती तलवार डोक्यावर राहील. जानेवारी फेब्रुवारी मध्ये सत्तेचे पद हस्तगत करण्याची आकांक्षा पूर्ण होईल. एप्रिल मे मध्ये कुटुंबात तणाव उद्भवतील. जुन्या नव्या विचारांचा संघर्ष होईल. जुलै ऑगस्ट मध्ये तरूणांना आवडीप्रमाणे अनुरूप स्थळ मिळेल. ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये व्यावसायिक स्पर्धेत बाजी माराल. प्रतिष्ठेत भर पडेल.

महत्वाचे वर्ष : ४, १३, २२, ३१, ४०, ४९, ५८, ६७, ७६.
भाग्यरत्न : गोमेद
याच तारेखेची व्यक्ती : आशालता, भा. रा. भागवत

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com




# आम्ही जरांगे मराठा आरक्षणाची संघर्षगाधा या दिवशी येणार प्रेक्षकांच्या भेटीला

मकरंद देशपांडे यांचा मनोज जरांगे पाटील यांच्या आयुष्यावर आधारीत असलेला 'आम्ही जरांगे' मोठ्या पडद्यावर...
दिक्षा पाटील । णविरींशव: चरू २९, २०२४, ०३:५५ झच् खडढ
'आम्ही जरांगे' मराठा आरक्षणाची संघर्षगाधा 'या' दिवशी येणार प्रेक्षकांच्या भेटीला ींळींश्रश= मराठा आरक्षणाच्या संघर्षगाथेची रुपेरी पडद्यावर जिवंत अनुभूती करून देणारा. आम्ही जरांगे – गरजवंत मराठयांचा लढा' हा चित्रपट येत्या १४ जूनला प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. मराठा आरक्षणासाठी संघर्ष करणारे सामाजिक कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या ज्वलंत चळवळीला मोठ्या पडद्यावर चित्रपटाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.
'आम्ही जरांगे – गरजवंत मराठ्यांचा लढा' मागील शंभर वर्षापासून सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या चळवळीसाठी झटलेले आणि आपल्या जीवाचे बलिदान देणारे मराठा क्रांतिवीर यांचा न पाहिलेला इतिहास पहिल्यांदाच चित्रपट रुपात रूपेरी पडद्यावर येत असल्याने प्रेक्षकांसाठी ही एक पर्वणीचं असणार आहे.
या चित्रपटाची संकल्पना डॉ. मधुसूदन मगर यांची असून, या भन्नाट क्रांतिकारी चित्रपटाची कथा – पटकथा सुरेश पंडित यांनी लिहिली आहे. चित्रपटाचे संवाद सुरेश पंडित, संजय नवगिरे व किशोर गरड




यांनी लिहिले असून, या चित्रपटाचे छायाचित्रकार विकास सिंह हे आहेत. चित्रपटाची गीते सुरेश पंडित, पी शंकराम यांनी संगीतबद्ध केली आहेत. मंगेश कांगणे, सुरेश पंडित, पी शंकराम यांनी चित्रपटाची गीते लिहिली आहेत. हिंदीचे सुप्रसिद्ध दिग्गज गायक सोनू निगम, मराठी व हिंदीत नावाजलेले संगीतकार व गायक अजय गोगावले, नकाश अझीझ, आदर्श शिंदे, यांच्या सुमधुर सुरांनी चित्रपटाची गाणी स्वरबद्ध केली आहेत.
या चित्रपटांमध्ये मकरंद देशपांडे, सुबोध भावे, प्रसाद ओक, अजय पुरकर, विजय निकम, कमलेश सावंत, भूषण पाटील, चिन्मय संत, अमृता धोंगडे, अंजली जोगळेकर, आरती त्रिमुखे, प्रेम नरसाळे ही गाजलेली सुप्रसिद्ध कलाकार मंडळी आहेत. नारायणा प्रोडक्शन निर्मित आणि योगेश पांडुरंग भोसले दिग्दर्शित आम्ही जरांगे गरजवंत मराठयांचा लढा हा, चित्रपट असून, या चित्रपटाचे सहनिर्माते उत्तमराव नारायणराव मगर, डॉ. मधुसूदन उत्तमराव मगर, विक्रम विठ्ठलराव पाटील, दमयंती विठ्ठलराव पाटील, दादा दत्ता यशवंतराव मोरे, योगेश पांडुरंग भोसले हे आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्यासोबतच 'गरजवंत मराठ्यांचा लढा' हा आता फक्त महाराष्ट्रापुरता मर्यादित राहिला नसून तो जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचला आहे. त्यामुळे अर्थातच 'आम्ही जरांगे' या चित्रपटाविषयीची उत्सुकता प्रदर्शना आधीपासूनच शिगेला पोहोचली आहे, येत्या १४ जूनला हा चित्रपट चित्रपटगृहात प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.

# दीर्घकाळ अनियंत्रित मधुमेहामुळे, स्त्री आणि पुरुष दोघांमध्ये लैंगिक समस्या निर्माण होतात

बदलत्या जिवनशैलीमुळे आज अनेकांना मधुमेहाचा आजार जडत आहे. मात्र जर का हा आजार दीर्घकालीन व अनियंत्रित राहीला, तर त्याचे काय दुष्परिणाम भोगावे लागतात. ते आपण जाणुन घेऊया.




पुरुषांमधील समस्या : दीर्घकालीन अनियंत्रित मधुमेह असणाऱ्या पुरुषांमध्ये, टेस्टोस्टेरॉनची पातळी कमी होते. प्रणयाची आवड आणि उत्साह कमी होतो. नैराश्य, चिंता, आळस, वजन वाढणे, वारंवार लघवीचे संक्रमण होणे, इरेक्टाइल डिसफंक्शन आणि प्रजनन क्षमता कमी होणे ही देखील लक्षणे आढळते.
स्त्रिांमधील समस्या : तर दीर्घकालीन अनियंत्रित मधुमेह असणाऱ्या महिलांमध्ये शारीरिक आणि मानसिक समस्या सुरू होतात. लैंगिक इच्छेचा अभाव, योनीमार्गात कोरडेपणा, संभोग करताना वेदना, मूत्रमार्गात संसर्ग इत्यादी. सामान्य महिलांच्या तुलनेत पीसीओएस असलेल्या तरुण स्त्रियांमध्ये मधुमेह १० पट जास्त आहे. पीसीओएस मुळे प्रभावित झालेल्यांमध्ये, पेशी इन्सुलिन शोषत नाहीत, ज्यामुळे रक्तातील इन्सुलिनचे प्रमाण वाढते, ज्यामुळे गर्भधारणेमध्ये व्यत्यय येतो. मासिक पाळी दरम्यान ओव्हुलेशन प्रतिबंधित करते. त्वरित काही उपाय केल्यास, अशा दुष्परिणामांवर मात करता येते.
दीर्घकालीन अनियंत्रित मधुमेह नियंत्रित करण्यास उपाय : नियमित औषधोपचाराने ग्लुकोजचे प्रमाण काटेकोरपणे नियंत्रित केले पाहिजे. गरज पडल्यास इन्सुलिनचे इंजेक्शन घेण्यास अजिबात संकोच करू नका. आहारात हिरव्या पालेभाज्या, गाजर, शेंगा, वाटाणे, ब्रोकोली, ताजी फळे, काजू घ्या. यामध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. हे रक्तामध्ये ग्लुकोज लवकर जमा होण्यापासून प्रतिबंधित करते. यासाठी दररोज व्यायाम करणे आवश्यक आहे. ध्यान आणि योगा एकत्र करणे अधिक चांगले आहे. कॉम्प्युटर, लॅपटॉप, टीव्ही समोर बसणे कमी करावे. पुरेशी लांब झोप घ्यावी. धुम्रपान, मद्यपान, कॅफीनचे अतिसेवन या सवयी टाळाव्यात. चांगली पुस्तके वाचणे, मधुर संगीत ऐकणे, यासारख्या तणाव कमी करणाऱ्या गोष्टी करा.
पुरुषांमधील इरेक्टाइल डिसफंक्शन आणि स्त्रियांमध्ये योनीमार्गाच्या स्नायूंचे अनैच्छिक आकुंचन यासारख्या समस्यांवर उपचार केले पाहिजेत. लैंगिक समस्यांबद्दल काही चिंता असल्यास मानसशास्त्रज्ञांचा सल्ला घ्या. सुरक्षित सेक्ससाठी कंडोम वापरा. जोडीदारासह रोमँटिक जीवनासाठी वचनबद्ध राहा.

# कर्मयोगिनी..राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर ! मल्हारराव होळकरांची अहिल्योबा!! जन–मना वर सत्याची आणि समाधानाची कास धरणारी अहिल्यादेवी!! आजकालकालच्या प्रत्येक स्त्री ला वाटत माझ्या सारखी मीच busy...मलाच खुप कामे, मीच सगळं का करावं? मला स्वतःसाठी काही नको का? मी का घरातील वडिलधार्यांची जबाबदारी घेऊ? स्वतःच्याच जगण्याला कुरवाळत बसणार्या स्त्रियांनी अहिल्यादेवींना थोड अभ्यासाव म्हणजे स्त्रीअस्तित्वाची समज येईल. दुर्देवाने अहिल्यादेवींवर समग्र असे चरित्र अजुनही आले नाही. आयुष्याची व्याप्ती सुराज्यात संकल्पित करणारे मल्हाराव होळकर यांची ही स्नुषा माझ्यासाठी वडीलांनी दिलेल्या अमुल्य माहिती मधिल एक विद्वत, दूरदृष्टी असलेल्या राजकर्त्या म्हणुन कायम हृदयस्थ!

रणनिती , आणि राजकारणनिती जाणत ,सासर्यांच्या शिक्षणासोबत ..मार्गदर्शनाखाली शिकत गेलेली अहिल्या..बाईजींची लाडकी सुन....पुण्यश्लोक अहिल्या बनतांना..पैसा, अधिकार आणि वर्चस्व हातात असतांना पण शेवटपर्यंत एक ...स्वराज्याची सेवक, निस्पृहतेची मुर्ती आणि सौजन्याची तपस्विनी म्हणुन जगली! असंख्य दुःख म्हणजे काय असतात आणि त्यांना सामोर जातांना जगण म्हणजेच देवानं दिलेल देण कसं जपायच आणि कर्मयोगिनी बनत..जगायच असत ! हे ह्या कर्मयोगिनीला समजुन घेतांना लक्षात येत.



छत्रपती शिवाजी महाराज जसे सर्वोत्कृष्ट राज्यकर्ते होते, राजमाता, पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी ह्या सर्वोत्कृष्ट राज्यकर्त्या होत्या. दोन वेळेस दिल्ली तख्तास हरविणारे सुभेदार मल्हारराव होळकर म्हणजे बावण्ण लढाईचा अनुभव असलेले एकमेव थोर सुभेदार! ज्यांची नकळत नजर अहिल्यादेवी वर पडली आणि आठ वर्षीय अहिल्या थोरल्या मल्हाराव होळकर सुभेदारांचे पुत्र खंडेराव ह्यांच्या पत्नी झाल्या! पुण्यातील शनिवारवाडा आजही त्या विवाहाचा साक्षिदार म्हणुन जगतो! माणकोजी शिंदे त्या काळात स्त्रीशिक्षण प्रचलित नसले तरी अहिल्यादेवींना शिक्षणाने समृध्द करणारे पिता होते! राजकारणाचे धडे घेतलेली अहिल्या सुभेदार मल्हारराव होळकरांकडे तलवारबाजीत तरबेज ठरली. माणसं ओळखण्याचा तिचा आवाका मल्हाररावांना लक्षात आला. राज्य शासनातील धोरणांची ते अहिल्याशी चर्चा करत. खंडेरावांचा लढाईत मृत्यु झाला आणि अहिल्येला चितेवर बसू न देणार्या सुभेदार मल्हारराव होळकरांना अवघा महाराष्ट्रच नव्हे तर ब्रिटिश सरकारने पण नमन केले! अठराव्या शतकातील जगातील महान शासक महिला म्हणुन ब्रिटिंश सरकारने त्यांचा उल्लेख केलेला आढळतो.

पति निधना नंतर २० मे १७९५ रोजी मल्हाररव होळकर यांचा मृत्यु अहिल्येस पाहावा लागतो. धिरोदत्त सासर्याच्या कर्तृत्वाचा आणि कर्माचा अभ्यास करत अतिशय चांगल्या प्रकारे एक शासक म्हणून अहिल्यादेवींनी आपल बहुमोल आयुष्य घडवलं. पानीपतच्या युध्दात लाख सैनिक मृत्युमुखी पडले. त्यांच्या विधवा झालेल्या पत्नींना, त्यांच्या मदतीस सर्वप्रथम अहिल्यादेवी धावल्या. महेश्र्वर साडीचा उद्योग स्त्रियांसाठी त्यांनी सुरू केला. जगातील पहिला सामुहिक विवाह सोहळा सुध्दा अहिल्यादेवींनीच केला. विरक्ती हीच एक संस्कृती असते हे त्यांच्या जगण्यातून लक्षात येत. मालेराव हा त्यांचा पुत्र लवकरच मरण पावला. अहिल्यादेवींनी एकोन्तीस वर्ष राज्यकारभार पाहिला. ज्यात चौदा दुष्काळ होते परंतु एकही शेतकरी आत्महत्या नव्हती. त्यांनी पाचच लढाया केल्या कारण जास्त लढाया रयतेसाठी हानिकारक असतात हे मल्हाररावांप्रमाणे त्यांचे पण म्हणणे होते. फक्त हातात पिंड घेतलेली स्त्री म्हणजे अहिल्यादेवी नसुन एक उत्कृष्ट राज्यकर्ती म्हणुन अहिल्येचा वचक होता.
मध्ययुगीन कालखंडात स्त्रीयांचे जीवन रूढी – परंपराच्या चौकटीमध्ये बांधले गेलेले होते. स्त्रियांचे नखदेखील कुणाला दिसू नये इतके त्यांना मपडदानशीनफ केले गेलेले होते. पण त्याच काळात परंपरेची बंधने झुगारून देणार्या आणि प्रसंगी रोष ओढवून घेणार्या अहिल्यादेवीच होत्या. परंतु केवळ आत्मविश्र्वास आणि धडाडीच्या जोरावर अहिल्यादेवींनी स्वत:ला मिळालेल्या संधीचे सोने केले. आपल्या राज्यात विधवांना दत्तकपुत्र घेण्याचा अधिकार देणे, बालविवाहास प्रतिबंध करणे, स्त्रियांचे स्वतंत्र सैनिक प्रशिक्षण केंद्र काढणे व स्त्रियांची बटालियन स्थापन करणे.
महिला विणकरांना प्रोत्साहन देणे आणि एका अर्थाने वस्त्रोद्योग व्यवसायाचा पाया घालणे यासारखी त्यांनी महिला सक्षमीकरण केले.
बारा जोर्तिलिंगाची स्थापना आहेच पण काशी विश्वेश्वराच्या मंदिरास पण ज्ञानवापी मस्जिदेच्या जवळ स्वखर्च करत त्यांनी उभे केले. तीनशे वर्षापुर्वी अयोध्येत राममंदिर उभारण्याचे पण त्यांचेच श्रेय ! सर्वधर्म समभाव जगणार्या अहिल्यादेवी सतत पुण्यश्लोक म्हणुन आदर मिळवुन राहिल्या. ज्यांनी १२ ज्योतिर्लिंगाचा जीर्णोद्धार केला, असंख्य धर्मशाळा बांधल्या, असंख्य नदीघाट, मंदिरे, पाणवटे, विहिरी, बांधल्या. प्रचंड अन्नदान केले, ज्यांना अखंड भारतामध्ये फक्त पुण्यश्र्लोक आणि देवी ही उपमा मिळाली अशा अखंड भारताच्या दैवत राजमाता पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म ३१ मे, १९२५ रोजी, गावी चौंडी , जामखेड तालुका, अहमदनगर जिल्ह्यात झालेला.
न कळत लहानपणापासुन पाहिलेली परळी वैजनाथ मंदिरामधिल अहिल्या बाई होळकरांची मुर्ती राहुन– राहुन नजरेसमोर उभी राहत होती ! धन्य ती माऊली, धन्य ते माता पिता आणि धन्य ती पावनभुमी...जिने अशी कृर्तृत्वान, पुण्यवान आणि सत्यवान स्त्रीला जन्म देत... पुण्यश्लोक ..महिमा घडवली !..वंदनम्

**अर्चना पैके.**
उदगीर.
९४२०४३५०८१

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे–येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्ल्वीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ–ळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई–वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर
आडवे उत्तर
१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा
उभे उत्तर–१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

## दहावी बोर्ड परिक्षेत १०० पैकी १०० टक्के घेतलेल्या अनुष्का सुकने व पालकाचा सत्कार




उदगीर/प्रतिनिधी : येथील किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर द्वारा संचलित विद्यावर्धिनी इंग्लिश स्कूल उदगीर या शाळेतील विद्यार्थिनी कु. अनुष्का विवेकानंद सुकने हिने मार्च२०२४ मधे घेण्यात आलेल्या एस.एस.सी.बोर्ड परीक्षेत १०० पैकी १०० टक्के गुण घेऊन शाळेचे, आई वडीलांचे नावलौकिक केल्याबद्दल अनुष्का सह तिचे वडील विवेक सुकने यांचा सत्कार शाळेच्या वतीने, संस्थेचे सचिव पि.टी.शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला, यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.सुप्रिया पाटील ,वैजंती पाटील,डि. पी.सुर्यवंशी आदींची उपस्थिती होती.

# लाल बहादुरशास्त्री विद्यालयाचे गुणवंत विद्यार्थी


मन्थन डावळे ९१.६०


कृष्णा जाधव ९१.४०


वेदांत स्वामी ९१.४०


अशितोष सासट्टे ९१.२०


उत्कर्षा पडीले ९०.८०


श्रावणी पाटील ९०.८०


वर्षा डोईजोडे ९०.६०


श्रेयश मोरे ९०.६०


प्रणव सिंदीकुमठे ९०.६०


जनक बिरादार ९०.४०


तनुजा गुणाले ९०.२०


विनुजा गुणाले ९०.२०


सोहम मनवाड ९०.२०


दिपक केंद्रे ९०.२०


अभिषेक राठोड ९०.२०

# डॉ विठ्ठल गोरे यांचे म्हैसूर येथे संशोधन सादर



उदगीर (प्रतिनिधी) येथील श्री हावगीस्वामी महाविद्यालयातील इंग्रजी विभागप्रमुख डॉ विठ्ठल गोरे यांनी सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ्फ इंडियन लँग्वेजेस, म्हैसूर, कर्नाटक येथे उदगीर येथील मराठी, कन्नड, हिंदी, उर्दू, सिंधी आणि तेलुगू बहुभाषिक लोकांचा सामाजिक-भाषिक अभ्यास या विषयावर संशोधन सादर केले.

भारतीय भाषांचे परस्परपूरक संबंध कसे आहेत. भारतीय भाषेतील अनेक शब्द सर्व भाषेत थोड्या फफार प्रमाणात कसे पहावयास मिळतात यांचे संशोधन करून अभ्यासपूर्ण शोधनिबंध सादर केले.

यावेळी विचारमचावर पूर्व-उत्तर विद्यापीठ सिलॉगचे प्रो.ओमप्रकाश, केरळ केंद्रीय विद्यापीठाचे प्रो. पी. श्रीकुमार, प्रो. चंद्रभूषण शर्मा, राष्ट्रीय नवीन शैक्षणिक धोरण समिती सदस्य, प्रो. राजेशकुमार आय.आय. टी.चेन्नई आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ विठ्ठल गोरे यांनी शोधनिबंध सादरीकरण केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष अँड गुणवंतराव पाटील हैबतपूरकर, सचिव उमेश पाटील देवणीकर उपाध्यक्ष श्री.शिवकुमार हसरगुंडे, कोषाध्यक्ष श्री.शंकराप्पा हरकरे,प्रभारी प्राचार्य डॉ नामदेव येमेकर, उपप्राचार्य डॉ आप्पाराव काळगापुरे, इंग्रजी विभागाच्या प्रा.सौ. ज्योती संपाळे,प्रा.मनोहर भालके ,प्रा.ज्योती पाटील,प्रा.घाळे तसेच महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## तहसिलदार कार्यालय, जळकोट

(शाखा दंडणीय )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.१५/०५/२०२४

जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार शामराव निवृत्ती बटटेवाड वय ४२ वर्ष रा. चिंचोली ता. जळकोट जि. लातुर यांच्या मुलीच्या नामे शुभांगी शामराव बटटेवाड यांचा जन्म मौजे चिंचोली ता. जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक ०४/०६/२०१० रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील शुभांगी शामराव बटटेवाड यांचा जन्म दिनांक ०४/०६/२०१० रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी शुभांगी शामराव बटटेवाड यांचा जन्म दिनांक ०४/०६/२०१० रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु शुभांगी शामराव बटटेवाड यांचा जन्म दिनांक ०४/०६/२०१० रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय मरसांगवी ता. जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक १५/०५/२०२४ रोजी दिले

पुढे नेमलेली तारीख १५/०६/२०२४

तालुका दंडाधिकारी तथा,
तहसिलदार जळकोट

## जाहिरनामा

### दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ५१ /२०२४ निशाणी क्र.

अर्जदार ईश्वर पि. धोंडिबा रावळे ज्यापेक्षा वडील नामे धोंडिबा रामचंद्र रावळे हे दिनांक १५/०६/२०२१ रोजी मौजे देवणी ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | शकुंतला धोंडिबा रावळे | ५५ | पत्नी |
| २) | ज्ञानेश्वर पि. धोंडिबा रावळे | ३५ | मुलगा |
| ३) | ईश्वर पि. धोंडिबा रावळे | २७ | मुलगा |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक २१/०५/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : १३/०६/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) व.लिपिक — शिक्का — (सहा.अधिक्षक)

## तहसिलदार कार्यालय, जळकोट

(शाखा दंडणीय )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.११/०३/२०२४

जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार बिरादार रंजना माधव वय १९ वर्ष रा. चिंचोली ता. जळकोट जि. लातुर यांचा जन्म मौजे चिंचोली ता. जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक. ०१/१०/२००५ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार बिरादार रंजना माधव यांचा जन्म दिनांक ०१/१०/२००५ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार बिरादार रंजना माधव यांचा जन्म दिनांक ०१/१०/२००५ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु अर्जदार बिरादार रंजना माधव यांचा जन्म दिनांक ०१/१०/२००५ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय चिंचोली ता. जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक ११/०३/२०२४ रोजी दिले

पुढे नेमलेली तारीख १०/०४/२०२४

तालुका दंडाधिकारी तथा,
तहसिलदार जळकोट

## तालूका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय

(दंडणिय विभाग)

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.३०/०५/२०२४

जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार मेहताब मंजुसाब शेख रा. कुमठा खु. ता.उदगीर यांचा जन्म दिनांक ०१/०६/१९९० रोजी मौजे कुमठा खु. ता. उदगीर येथे झाला असून जन्म नोंदवहीला त्यांची जन्म करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार मेहताब मंजुसाब शेख रा. कुमठा खु. ता.उदगीर यांनी त्यांचा जन्म दिनांक ०१/०६/१९९० रोजीची नोंद जन्म नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक २४/०५/२०२४ रोजही अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक ०१/०६/१९९० रोजी मौजे कुमठा खु.ता. उदगीर येथे बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी मणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार मेहताब मंजुसाब शेख रा. कुमठा खु. ता.उदगीर यांचा जन्म दिनांक ०१/०६/१९९० रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय कुमठा खु. ता.उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत वतास आदेशीत करण्यात येईल.

दिनांक ३०/०५/२०२४ रोजी दिले.

पूढे नेमलेली तारीख ३०/०६/२०२४

तालुका दंडाधिकारी तथा,
तहसिलदार उदगीर

## तालूका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय

(दंडणिय विभाग)

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.२७/०५/२०२४

जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार मंजुसाब इब्राहिमसाब शेख रा. कुमठा खु. ता.उदगीर यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९५७ रोजी मौजे कुमठा खु. ता. उदगीर येथे झाला असून जन्म नोंदवहीला त्यांची जन्म करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार मंजुसाब इब्राहिमसाब शेख रा. कुमठा खु. ता.उदगीर यांनी त्यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९५७ रोजीची नोंद जन्म नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक २४/०५/२०२४ रोजही अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९५७ रोजी मौजे कुमठा खु.ता. उदगीर येथे बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी मणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू मंजुसाब इब्राहिमसाब शेख रा. कुमठा खु. ता.उदगीर यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९५७ रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय कुमठा खु. ता.उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत वतास आदेशीत करण्यात येईल.

दिनांक २७/०५/२०२४ रोजी दिले.

पूढे नेमलेली तारीख २८/०६/२०२४

तालुका दंडाधिकारी तथा,
तहसिलदार उदगीर

## तालूका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय

(दंडणिय विभाग)

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.२७/०५/२०२४

जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार हसिना मंजूसाहेब शेख रा. कुमठा खु. ता.उदगीर यांचा जन्म दिनांक २६/०१/१९८३ रोजी मौजे कुमठा खु. ता. उदगीर येथे झाला असून जन्म नोंदवहीला त्यांची जन्म करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार हसिना मंजूसाहेब शेख रा. कुमठा खु. ता.उदगीर यांनी त्यांचा जन्म दिनांक २६/०१/१९८३ रोजीची नोंद जन्म न व्हीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक २४/०५/२०२४ रोजही अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक २६/०१/१९८३ रोजी मौजे कुमठा खु.ता. उदगीर येथे बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी मणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार हसिना मंजूसाहेब शेख रा. कुमठा खु. ता.उदगीर यांचा जन्म दिनांक २६/०१/१९८३ रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय कुमठा खु. ता.उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत वतास आदेशीत करण्यात येईल.

दिनांक २७/०५/२०२४ रोजी दिले.

पूढे नेमलेली तारीख २८/०६/२०२४

तालुका दंडाधिकारी तथा,
तहसिलदार उदगीर





## उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०

दररोज ४ शो




## उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!

अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ | डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) | डॉ. दिपाली पाटील (MS)

डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) | डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष | व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर | लॉ. प्रदिप बेंद्रे सचिव




# लोकनेते स्व. विलासराव देशमुख यांच्या ७९ व्या जयंती निमित्त राज्यस्तरीय बुध्दीबळ स्पर्धेचे आयोजन



लातूर: लोकनेते स्व. विलासराव देशमुख यांच्या ७९ व्या जयंती निमित्त मनोधैर्य सेवाभावी संस्था, लातूर जिल्हा बुध्दीबळ संघटना व राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (स्वायत्त)लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने लोकनेते विलासराव देशमुख चेस चॅम्पियनशीप (एक दिवसीय (खुल्या) जलदगती राज्यस्तरीय बुध्दीबळ स्पर्धा आयोजीत करण्यात आली आहे.

राज्यस्तरीय बुध्दीबळ स्पर्धेचे उद्घाटन दि. ०२ जून २०२४ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय,चंद्रनगर बसस्टन्ड जवळ,लातूर येथे सकाळी ९:३० वा.मान्यवरांच्या हस्ते होणार असून बक्षीस वितरण याच दिवशी स्पर्धा संपल्यानंतर ठेवण्यात आले आहे. लोकनेते विलासराव देशमुख चेस चॅम्पियनशीप -२०२४ या (एक दिवसीय खुल्या जलदगती राज्यस्तरीय बुध्दीबळ स्पर्धा) संस्थेचे अध्यक्ष गायकवाड पवनकुमार व उपाध्यक्ष शेख सिराज यांच्या पुढाकारातून होत असून ही स्पर्धा पार पाडण्यासाठी माजी उपमहापौर कैलास कांबळे, माजी नगरसेवक इम्रान सय्यद, शेख असलम,शेख इरफान,शेख फारुख,शेख महमद, डी.उमाकांत,शेख खाजा पाशा, सचिन वाघमारे,संजय सुरवसे, आकाश मगर,इलीयाज शेख परिश्रम घेत आहेत.प्रथम -११ हजार, द्वितीय ७ हजार तर तृतीय ५ हजाराचे पारितोषिक राज्यस्तरीय होणाऱ्या या स्पर्धेत प्रथम ११ हजार, द्वितीय ७ हजार तर तृतीय ५ हजार असून एकूण आकर्षक ३० पारितोषिक व २० चषक आहेत.एकूण बक्षीसाची रक्कम हजारोंच्यावर असून या स्पर्धा गायकवाड पवनकुमार यांच्या संकल्पनेनुसार लातूर जिल्हयातील व राज्यातील उत्कृष्ट बुध्दीबळ पटू आहेत. त्यांच्या कलेला वाव मिळावा या हेतूने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत स्थानिक स्पर्धांकांनी जास्तीत जास्त नाव नोंदणी करुन सहभाग नोंदवावा असे आवाहन मनोधैर्य सेवाभावी संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विनर चेस अकडमी,क्रिडा संकुल लातूर येथे व श्रीराम साने मो. ९८९०८२२५८९/८१४९५३३५५५,अमितकुमार बियाणी मो.९०४९५९५५१०/७३८५४१४७१७,श्रीकांत मंत्री मो. ९२३४१४८८८१,उदय वगारे मो.८८८८०४५३४४,अनिरुध्द बिराजदार मो. ९९२३२३७८०८, यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## कर्मयोगी तुळशीराम पवार कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी पायलट प्रवेशासाठी पात्र



हडोळती दि.२९ (नागसेन गायकवाड):कर्मयोगी तुळशीराम पवार कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी गोविंदराज राजाराम पवार याने जेईई परीक्षा २०२४ मध्ये घवघवीत यश संपादन केल्यामुळे हार्दिक अभिनंदन. पवार गोविंदराज राजाराम हा विद्यार्थी ए एम इ सी इ टी २०२४ परीक्षेत ३६० पैकी २९२ मार्क(ए आय आर-७१०) घेऊन उत्तीर्ण झाला. पायलट प्रवेशासाठी पात्र झाल्यामुळे त्याचे कौतुक किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा.पी.टी.पवार सर,सचिव डॉ. निलेशभैय्या पवार, प्राचार्य डॉ. डी.डी.बच्चेवार सर, पर्यवेक्षक प्रा.एम.डी.सूर्यवंशी सर, शिक्षक,प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी व गावकऱ्यांच्या वतीने उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# मुंबईतील उदगीरकरांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न



लातूर / प्रतिनिधी- सहयोग मंदिर ठाणे येथील सभागृहात रवीवार दिनांक २६ में रोजी मुंबईतील उदगीरकरांचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता.

मराठवाड्यातील उदगीर या ऐतिहासिक नगरीतून नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने मुंबईत आलेले व स्थिरावलेले मुळचे उदगीरकर यात उत्साहाने सहभागी झालेले होते. एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ या थोर शिकवणुकीप्रमाणे एकमेकांना अडीअडचणीच्या काळात मदत करणे मार्गदर्शन करणे आधार देणे व सांस्कृतिक वारसा जोपासत वाटचाल सुरू ठेवणे हे या स्नेहमेळाव्याचा उद्देश्य आहे हे या स्नेहमेळाव्याचे संयोजक तथा मार्गदर्शक असणारे निवृत्त मुख्याध्यापक आर पी माने यांनी आपल्या मनोगतातून स्पष्ट केले. या स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने आयोजित परीचय समारंभादरम्यान मनोगत व्यक्त करताना उदगीरकर आपली उदगीर ते मुंबईपर्यंत वाटचाल कशी झाली त्या प्रवासातील अनुभव मांडत होते. निवृत्त मुख्याध्यापक असणारे व मुळचा शिक्षकी पेशा व समाजसेवेची प्रचंड आवड असणारे श्री आर पी माने सर हे या स्नेहमेळाव्याचे संयोजक तथा मार्गदर्शक होते. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली विशेषतः त्यांचे माजी विद्यार्थी एकत्र येऊन व्हाटसअपवर मुंबईतील उदगीरकर या समुहाची स्थापना केली. नंतर एक एक मुंबईत स्थिरावलेला उदगीरकर या समुहाला जोडला गेला व या पहिल्या वहिल्या स्नेहमेळाव्यात जवळ जवळ शंभर उदगीरकरांनी आपली उपस्थिती नोंदवली.

शासकीय खाजगी मोठमोठ्या पदांवर काम करणारे तथा स्वतःचा व्यवसाय आदी क्षेत्रामध्ये मोठी कामगीरी केलेले उदगीरकर या समारंभात आपले मनोगत व्यक्त करत होते. व्यक्ती नोकरी व्यवसायासाठी स्थलांतरीत होतो मात्र आपल्या मुळ गावची ओढ मात्र त्याला कायम असते त्याचे कारण तेथील सांस्कृतिक वातावरणात तो लहानाचा मोठा झालेला असतो त्यामुळे त्याच्या व्यक्तीमत्वावर तेथील संस्कृतीचा मोठा प्रभाव असतो. या मेळाव्याला आवर्जुन उपस्थित राहीलेल्या मंडळीचा आपल्या जन्मभुमीप्रती असणारा जिव्हाळा हा समान धागा असल्याचे या स्नेहमेळाव्यात दिसून आले. या स्नेहमेळाव्याच्या यशस्वितेसाठी पी आय शिवशंकर मोरे, मन्मथ बिरादार, डॉ. नंदकुमार पाटील, आदित्य गांगजी, जमील परकोटे, प्रदिप पुरी, सतीश डोईजोडे, चंद्रशेखर डोईजोडे, सुचिता जैन, अक्कानवरू, डॉ. बळीराम पारसेवार आदी सदस्यांनी मेहनत घेतली.

# अवकाळी पाऊस व वादळ वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून वीज पुरवठा सुरळीत करा

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) - अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानाची पंचनामे करून वीज पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पार्टीचे प्रदेश सरचिटणीस डॉ प्रतापसिंह पाटील यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, जिल्ह्यातील आठही तालुक्यामध्ये झालेल्या वादळी वाऱ्यासह, पावसाने मोठे नुकसान झाले आहे. यामध्ये अनेक शेतकरी बांधवांच्या फळबागा व पिके उध्वस्त झाली आहेत. तसेच अनेकांच्या घरांची पडझड होऊन नुकसान झालेले आहे.

वादळ वाऱ्यामुळे व अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानी संदर्भात संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना आदेशित करून पंचनामे करण्यास सांगावे. तसेच अवकाळी पाऊस व वादळ वाऱ्यामुळे जिल्ह्यातील अनेक भागात वीज पुरवठा बंद झालेला आहे. त्या ठिकाणी वीज पुरवठा तात्काळ सुरळीत व्हावा व संबंधित खात्याला निर्देश द्यावेत व लवकरात लवकर वीज पुरवठा सुरळीत व्हावा अशी मागणी डॉ पाटील यांनी केली आहे.

# शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक




लातूर / प्रतिनिधी- येथील शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. एम. आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दहावी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले.

यावेळी डॉ. एम. आर. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिकून खूप मोठे व्हा, सामाजिक बांधिलकी जोपासा, आई-वडिलांच्या कर्तव्याची जाण ठेवा. मोबाइलचा वापर जपून करावा. भविष्यातील शैक्षणिक निर्णय योग्य पध्दतीने घ्यावेत, असे ते म्हणाले. मार्गदर्शक शिक्षक व यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांनी कौतुक केले.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही शाळेचा निकाल १०० टक्के लागला आहे. विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम राखली आहे, असे प्रास्ताविकात शाळेचे प्राचार्य प्रा. एल. टी. पुरी यांनी सांगितले. शाळेतून शहाण सादिक शेख हा प्रथम, मेघना धनराज बनाळे ही द्वितीय व समीक्षा गोविंद चिलकुरे तृतीय आली आहे. अन्य विद्यार्थ्यांनीही घवघवीत यश संपादन केले आहे. यावेळी विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी व पालकांनीही मनोगत व्यक्त केले.सूत्रसंचालन मीनाक्षी सूर्यवंशी यांनी केले.

# शिवसेना व झेंडा ग्रुपच्यावतीने घरपोच मोफत पाणी वाटप

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) - शहरामध्ये पाणी टंचाईच्या असल्यामुळे शिवसेना व झेंडा ग्रुपच्यावतीने घरपोच मोफत पाणी वाटपाचा उपक्रम युवा सेना शहरप्रमुख रवी वाघमारे यांनी शिवसेनेच्या दुष्काळ गंभीर आणि शिवसेना खंबीर या धोरणानुसार प्रभाग क्र.१६ मध्ये राबविण्यात येत आहे.

सध्या धाराशिव शहरात ८ ते १० दिवसा आड पाणी पुरवठा होत आहे. प्रचंड उन्हाळ्याच्या झळा अन् त्यात पाणी टंचाई यामुळे जनता हैराण झाली आहे. गणेश नगर भागातील नागरिकांसाठी स्वखर्चाने घरपोच मोफत पाणी वितरण करण्यात येत आहे. फोन केल्यानंतर तात्काळ ५०० लिटर पाण्याचा टँकर संबंधित नागरिकांना तात्काळ घरपोच पाठविण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे टंचाईच्या काळात नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे.

## जाहीरनामा

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार चाकूर, यांचे कार्यालय (दंडणीय विभाग)**

---

**जा.क. २०२४/एमएजी/कावि ३२.....दि. २९ ५/२०२४**
**अर्जदार श्री. लेख खैरुजबी जिलानी**
**विरूध्द**
**गैरबर्जदार मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, दापस्याक**
**अर्ज कलम १३(३)**

कोर्टाचा शिक्का

**जन्म-मृत्यु नोंदणी कायदा**

याव्दारे सर्व जनतेस काळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार श्री. लेख खैरुनयी जिलानी रा. दापक्याळ ता. चाकुर जि. लातुर यांनी १३ (३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार यांची असुन त्याचे पती कै. शेख जिलानी हवीबसाब याचा दि. १६/१२/१९९४ रोजी राहत्या घरी मृत्यु झाला आसुन मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय दापक्याळ ता. चाकुर जि. लातुर येथे मृत्यु नोंद नसल्याने तीच्या मृत्यु तारखेची नोंदनी मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय दापक्याळ ता. चाकुर जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर मृत्यु तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यानी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोनाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंर प्राप्त शाले ल्या आक्षेपांचा अपवा हरकतीचा विवार करण्यात येणार नाही.

दि.२९/५/२०२४
पुढील तारीख ३०/०६/२०२४

**आदेशावरून**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार,**
**तहसील कार्यालय,चाकुर**

### पान १ वरून

### शेवटच्या टप्प्यातील...

मोदींनी २०१९ आणि २०१४ मध्ये अजय राय यांचा मोठ्या फरकाने पराभव केला होता, जेव्हा आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांनी पंतप्रधानांच्या विरोधात निवडणूक लढवली आणि ते दुसऱ्या क्रमांकावर होते.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे मूळ गाव असलेल्या गोरखपूरमध्ये दोन अभिनेते राजकारणी एकमेकांना आव्हान देत आहेत. रवि किशन शुक्ला या नावाने प्रसिद्ध असलेले भाजपचे खासदार रवींद्र किशन शुक्ला सलग दुसऱ्यांदा ही जागा राखण्यासाठी लढत आहेत. त्यांचा सामना भारत ब्लॉकच्या उमेदवार काजल निषाद हिच्याशी आहे, जो एक भोजपुरी अभिनेता देखील आहे.

मिर्झापूरची जागाही एनडीएसाठी महत्त्वाची आहे. २०१९ च्या निवडणुकीत केंद्रीय मंत्री आणि अपना दल (सोनेलाल) च्या अध्यक्षा अनुप्रिया पटेल यांनी बहुमत मिळवले. त्यांचा सामना सपाचे राजेंद्र एस. बिंद आणि बसपाचे मनीष त्रिपाठी यांच्याशी आहे.

दुसऱ्या हॉट सीटवर, पारसनाथ राय, ज्यांना जम्मू आणि काश्मीर एलजी मनोज सिन्हा यांच्या जवळचे मानले जात होते, त्यांचा सामना एसपीच्या तिकिटावर नुकताच मृत्यू झालेला गुंड मुख्तार अन्सारीचा भाऊ अफजल अन्सारी यांच्याशी होणार आहे. २०१९ मध्ये, अफजल अन्सारी यांनी भाजपचे ज्येष्ठ नेते मनोज सिन्हा यांचा १.१९ लाख मतांनी पराभव केला. येथे उमेश कुमार सिंह बसपाकडून निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

### परदेशी कशाला...

मुख्यमंत्र्यांची पोस्ट काय?
परदेशी कशाला जायाचं
गड्या आपला गाव बरा
शेत पिकाची दुनिया न्यारी
वसे जिथे विठूरायाची पंढरी...

लोकसभा निवडणुकीच्या धकाधकीतून थोडा वेळ काढून महाबळेश्वर तालुक्यातील दरे या माझ्या मूळ गावी जाऊन थोडा विसावा घेतला.

यावेळी शेतशिवारात फेरफटका मारून शेती आणि मातीची पाहणी केली. जीवाला जीव देणाऱ्या गाई गुरांची चौकशी करून त्यांना प्रेमाने दोन घास खाऊ घातले. तसेच शेतात जाऊन चिकू, फणस, सुपारी आणि भाज्यांच्या लागवडीची पाहणी केली. इथली माती माझ्या मनाला शांतता देतेच पण पुन्हा एकदा नव्या जोमाने नवी आव्हाने सर करण्याचे बळही देते.

### आध्यात्मिक...

या सर्व बाबीचा अनुभव घेता ही बाब महत्त्वाची असून प्रवासा दरम्यान आपण आमच्या सतत संपर्कात राहावे. तिरुपती येथे आपली दर्शन व निवास व्यवस्था ही माजी गृहमंत्री आपले आदर्श शिवराजजी पाटील चाकूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम पद्धतीने केली असल्याचे सांगून त्यांनी सहलीमध्ये सहभागी झालेल्या दिव्यांग बंधू भगिनींना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रास्ताविक करताना फाउंडेशनचे अध्यक्ष माधव गोरे म्हणाले की, लातूर येथून निघणारी ही सहल रेल्वे मार्गे सोलापूरहून तिरुपतीला दि. ३० मे रोजी पोहोचणार असून तिथे लॉर्ड वेंकटेश्वरा व इतर देव-देवतांचे दर्शन घेऊन दि. ३१ मे रोजी तिरुपतीहून रेल्वे मार्गाने कोल्हापूरकडे रवाना होणार आहे. दि. ०१ जून २०२४ रोजी कोल्हापूर येथे महालक्ष्मी देवीचे दर्शन घेऊन कोल्हापूर परिसरातील इतर आध्यात्मिक स्थळांसह पर्यटन स्थळास भेट देणार आहे. दि. ३ जून रोजी ही सहल कोल्हापूरहून लातूरकडे प्रस्थान करणार आहे. दृष्टी दिव्यांग व अस्थिव्यंग व्यक्तींसह त्यांच्या परिवारातील १०० व्यक्तींचा या सहलीत सहभाग असणार आहे. दिव्यांग व्यक्तींना आध्यात्मिक अनुभव देणे हा या सहलीमागील हेतू आहे. तिरुपती येथील दर्शन व निवास व्यवस्था तथा कोल्हापूर येथील महालक्ष्मी देवीचे दर्शन व निवास व्यवस्था उपलब्धतेसाठी डॉ. अर्चनाताई पाटील आणि ॲड. विक्रमजी पाटील चाकूरकर यांच्या माध्यमातून देशाचे माजी गृहमंत्री शिवराजजी पाटील चाकूरकर यांच्यास्तरावरून सदर व्यवस्था उपलब्ध करून देण्यात बहुमोल सहकार्य लाभले आहे असेही ते म्हणाले.

यावेळी डॉ. विजयभाऊ राठी, प्राचार्य डॉ. संजय गवई, सामाजिक कार्यकर्ते कालिदास माने आणि ॲड. धनंजय चिथाडे यांनीही आपली मनोगत व्यक्त करून सहलीत सहभागी होणाऱ्या दृष्टी दिव्यांग व दिव्यांग व्यक्तींना शुभेच्छा व आर्थिक सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुदर्शन पाटील यांनी केले तर आभार प्रा. सुशील शेळके यांनी मानले.

या कार्यक्रमाला ॲड. विक्रमजी पाटील, लातूर बस आगार प्रमुख हनुमंत चपटे, सुनील ओझा, प्रवीण मिटकरी, ज्येष्ठ पत्रकार अरुण समुद्रे, एस.आर.कुलकर्णी, सुभाष चिने, अमोल निलंगेकर यांच्यासह ॲड. धनंजय चिताडे यांचे कौटुंबिक व मित्र परिवाराचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मतमोजणी कक्षातील...

अवलंबिण्यात येणाऱ्या कार्यपद्धतीची माहिती दिली.

मतमोजणी कक्ष परिसरातील सुरक्षा व्यवस्था, प्रवेशद्वारावरील तपासणी, मतमोजणीच्या प्रत्येक फेरीनिहाय आकडेवारीचे संकलन, टपाली मतमोजणी आदी बाबींचाही यावेळी आढावा घेण्यात आला. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक श्री. मुंडे यांनी मतमोजणी कक्षाची आणि परिसराची पाहणी केली. तसेच मतमोजणी दिवशीच्या पोलीस बंदोबस्ताबाबत आढावा घेतला.

मतमोजणी कक्षात मोबाईल घेवून येण्यास मनाई

मतमोजणी कक्षात भारत निवडणूक आयोगाने परवानगी दिलेल्या व्यक्तींशिवाय इतर कोणालाही मोबाईल घेवून प्रवेश करण्यास मनाई आहे. त्यामुळे उमेदवार, उमेदवारांचे प्रतिनिधी, मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना मतमोजणी कक्षात मोबाईल घेवून जाता येणार नाही. त्यामुळे प्रवेशद्वारावरच तपासणी करून सर्वांना मतमोजणी कक्ष परिसरात प्रवेश देण्यात येणार आहे.

## CHANGE IN NAME

I have change my name from DAULAT GANPATI MUSANDE To DAULATRAO GANPATI MUSANDE Hence for this declaration in future.
OLD NAME: DAULAT GANPATI MUSANDE
NEW NAME: DAULATRAO GANPATI MUSANDE In future the same name will be used by my spouse and children

**ADDRESS**
AT. DHANORA , PO – HASEGAON , DIST - LATUR , 413512 , MAHARASHTRA .
Mobile No: 8788178018

## नावात बदल

मी फरीस फातीमा जकी खान कायमखाणी रा लातूर मी हे जाहीरप्रगटनाद्वारे जहिर करते की माझेनाव माझ्या जुन्या पासपोर्ट वरती FARIS FATIMA ZAKIKHAN KAYAMKHANE असे झाले आहे तरी माझ्या इतर कदोपत्रीवर आधार आणि पानकार्ड वर FARIS FATIMA ZAKI KHAN KAYAMKHANI असे आहे मी माझ्या जिवनात FARIS FATIMA ZAKI KHAN KAYAMKHANI हे नाव वापरात घेईन संभितांनी नोंद घ्यावी.

**नवे नाव**
FARIS FATIMA ZAKIKHAN KAYAMKHANI
**जुने नाव**
FARIS FATIMA ZAKI KHAN KAYAMKHANE
**राहणार :- लातूर**
**मोबाईल:- ९८२३१ १६०७०**

## नावात बदल

मी जकी खान हमीद अली खान कायमखानी रा लातूर मी हे जाहीरप्रगट नाद्वारे जाहीर करतोकी माझेनाव माझ्या जुन्या पासपोर्ट वरती ZAKI KHAN HAMID ALI KHAN KAYAMKHANEअसे झाले आहे तरी माझ्या इतर कदोपत्रीवर आधार आणि पानकार्ड वर ZAKI KHAN HAMID ALI KHAN KAYAMKHANI असे आहे मी माझ्या जिवनात ZAKI KHAN HAMID ALI KHAN KAYAMKHANI हे नाव वापरात घेईन संभितांनी नोंद घ्यावी.

**नवे नाव**
ZAKI KHAN HAMID ALI KHAN KAYAMKHANI
**जुने नाव**
ZAKI KHAN HAMID ALI KHAN KAYAMKHANE
राहणार :- लातूर
**मोबाईल:- +९१ ९८२३१ १६०७०**

## CHANGE IN NAME

I have change my name from SHEKH LALASAHEB SHABBIR to SHAIKH LALA SHABBIR Hence froth this decleration and will be known by this name I will use SHAIKH LALA SHABBIR in future the same name will be used by my wife children and family.

**OLD NAME**
SHEKH LALASAHEB SHABBIR
**NEW NAME**
SHAIKH LALA SHABBIR
**ADDRESS**
At Gulkheda, Post-Taka, Tq. Ausa, Dist- Latur (M.S.) 413520


## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

प्रो. योगेश कुमार
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.
संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ४-७ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ०-४ | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

**लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर**
**नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना**

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवींवर नियम व अटी लागु.





# यशवंत

शुक्रवार दि. ३१ मे २०२४

पान ८

# उदगीर

कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

उपलब्ध सुविधा

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# शेळगाव,ता चाकूर येथील शिबिरामध्ये २६६ रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार





उदगीर (प्रतिनिधी) :- धन्वंतरी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँड चॅरिटेबल हॉस्पिटल,उदगीर यांच्या वतीने रविवार,दिनांक:-२६ मे २०२४ रोजी शाहू विद्यालय,शेळगाव येथे परिसरातील नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या मोफत सर्व रोगनिदान व औषधी उपचार तथा निशुल्क रक्तशर्करा (ब्लडशुगर) तपासणी शिबिराचा एकूण २६६ रुग्णांनी लाभ घेतला.

शिबिराचे उद्घाटन अहमदपुर-चाकुर विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय-कार्यसम्राट आमदार बाबासाहेब पाटील यांचे हस्ते भगवान धन्वंतरी च्या प्रतिमा पूजनाने करण्यात आले. अध्यक्षस्थानी सुभाष चापोले हे होते.

व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळ,अहमदपूरचे सदस्य साहेबराव जाधव व तसेच बापूसाहेब कज्जेवाड,गंगाधरराव अक्कानवरू,उत्तमराव पाटील,लक्ष्मण घुमे,मेघराज पाटील,माधव पाटील,घटकार सर,परमेश्र्वर केंद्रे,संपत मल्लीशे,गणेश पाटील,सचिन बदनाळे,प्रमोद चवळे,सतीश वाडकर,विश्र्वनाथ चवळे,संतोष जगताप,मनोहर लामदाडे,योगेश वाडकर,गणपत पाटील,पिंटू चवळे,इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविकपर भाषणात प्राचार्य डॉ.दत्तात्रय पाटील यांनी धन्वंतरी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँड चॅरिटेबल हॉस्पिटल,उदगीर च्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या विविध आरोग्य विषयक उपक्रमांची व शिबिरासंबंधी माहिती दिली.

उद्घाटनपर भाषणात आमदार बाबासाहेब पाटील म्हणाले की वेळेत योग्य निदान व आवश्यकतेनुसार उपचार घेतल्याने रोग लवकर बरा होऊ शकतो.आजाराकडे दुर्लक्ष केल्यास त्यामुळे रोग गंभीर अवस्थेकडे जातो व शरीराच्या अन्य अवयवांना सुद्धा बाधा करू शकतो. त्यामुळे सदरील मोफत रोगनिदान व औषधोपचार शिबिराचा लाभ जनतेने घ्यावा असे आवाहन केले.

शिबीराच्या समारोप प्रसंगी बोलताना बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व माजी मंत्री बाळासाहेब जाधव म्हणाले की कोरोनाच्या महामारीनंतर अनेकांमध्ये रोगप्रतिकारक्षमता कमी झालेली दिसून येते. त्यामुळे नागरिकांनी संतुलित व नियमित आहार-विहाराकडे लक्ष देणे आवश्यक असल्याचे सांगितले.

शिबीरामध्ये वातविकार-५८;मधुमेह-२२;मुळव्याध-१३;त्वचाविकार-२२;हार्नीया व हायड्रोसिल-७;नेत्ररोग-४९;ददंतरोग-१५;श्र्वसनविकार; पोटाचे विकार-२४, लहान बालकांचे आजार-२८; स्त्रियांचे विकार(मासीकपाळी समस्या,ई)-३८ याप्रमाणे विविध आजारांच्या एकूण २६६ रुग्णांची तपासणी व रोगनिदान करुन आवश्यकतेनुसार औषधी उपचार करण्यात आले .

शिबिरामध्ये लॉयन्स नेत्र रुग्णालय,उदगीर यांच्या सहकार्याने मोफत नेत्ररोग तपासणी करून एकूण ३९ व्यक्तींचे मोतीबिंदू आजाराचे निदान झाले व या नोंदणी केलेल्या व्यक्तींवर त्यांच्या सोयीनुसार लवकरच पुढील औषधोपचार व शस्त्रक्रिया सुद्धा करण्यात येणार आहे.

शिबिराच्या उद्घाटन व समारोप कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ.प्रशांत बिरादार यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.मंगेश मुंढे यांनी केले.

शिबीराच्या यशस्वितेसाठी डॉ.अमोल पटणे,डॉ.नामदेव बनसोडे,डॉ.योगेश सुरनर,डॉ. स्नेहल पाटील,डॉ.गुरुराज वरनाळे,डॉ.शिवकुमार मरतुळे,डॉ.रश्मी सुखदेवे,डॉ. प्रीती रोडगे तथा आंतरवासियता प्रशिक्षणार्थी व कार्यालयीन-रुग्णालयीन कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# दत्तगुरू इंग्लिश स्कूलची १००% निकालाची परंपरा कायम

उदगीर / प्रतिनिधी- मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून शहरातील दत्तगुरू इंग्लिश स्कूलची १००% निकालाची परंपरा यावर्षी सुद्धा कायम कायम राहिली आहे.

सदरील परीक्षेत एकुण ३२ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यापैकी विशेष प्राविण्यासह - २८, प्रथम श्रेणी - ०४, याप्रकारे विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. श्रद्धा बजाज या विद्यार्थिनीने १००% गुण मिळवून शाळेतून सर्वप्रथम येण्याचा मान मिळविला आहे. तर सृष्टी कोटलवार (९७.२०) व पृथ्वी सुर्यवंशी (९६.४०) हे विद्यार्थी अनुक्रमे सर्वद्वितीय व सर्व तृतीय आले आहेत.

उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा आशा ममदापुरे, सचिव अमन ममदापुरे, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक सचिन पाटील, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक माधव भांगे, रवि चनाले, सद्दाम मोमीन, पवन कुमार, प्रशांत भांगे, सरफराज मणियार, अनिता सुवर्णकार, रेश्मा कादरी, कविता तोंडारे, राजेश्र्वरी पारसेवार, प्रीती शेटकार, सारिका पेचफुले, संगीता पोपलाई, शकुंतला डांगे, दीक्षालिनी शिंदे, कविता क्षीरसागर व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# माहेश्वरी समाजातील २ विद्यार्थ्यांना १००% गुण



उदगीर / प्रतिनिधी-उदगीर येथील माहेश्वरी समाजातील विद्यार्थ्यांनी या ही वर्षी एस एस सी बोर्ड परीक्षेत आपला ठसा उमटविला असून यात श्रद्धा आनंद बजाज आणि आलोक अनिल मालू ने १००% गुण प्राप्त केले आहे,,अभिनव प्रविंनकुमार मूंदड़ा ने ९८.६०% , गुंजन दयानंद नावंदर ९४.८०%,राघवी रामबिलास नावंदर ९४%, अदिती अर्जुन जाजु ९३.६०%,किरण श्यामसुंदर मोदानी ९३.४०%, राधा संजय टवानी ९१.८०%, अंजली शिरीष नावंदर ९१.२%, श्रद्धा विष्णुदास ट्वाणी ९०.६०% गुण प्राप्त करत समाजाचे नाव रोशन केलें आहे त्यांच्या या यशाबद्दल उदगीर तालुका माहेश्र्वरी सभे चे अध्यक्ष श्रीनिवाससोनी,सचिवराजगोपाल मनियार, मार्गदर्शक डॉ रामप्रसाद लखोटिया, ईश्र्वरप्रसाद बाहेती, अशोक बाहेती,सदस्य द्वारकादास भूतडा,राधेश्याम इनानी,सत्यनारायण सोमानी , विष्णुदास लोया, आनंद बजाज,शिरीष नावंदर, डॉ.प्रवीण मुंदड़ा,अमोल राठी,राजेश सारडा,श्रीराम सारडा, भगवानदास राठी, संजय नावंदर,बालाप्रसाद मुंदड़ा यानी त्यांचें अभिनंदन करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# ३५ हजारांची फसवणूक

**उदगीर / प्रतिनिधी-** येथील एका एटीएम मशीनमध्ये कार्डाची अदलाबदल करून अज्ञाताने सेवानिवृत्ताच्या खात्यातून ३५ हजार ३०० रुपये काढून घेतल्याप्रकरणी ग्रामीण पोलिसांत सोमवारी फसवणुकीचा गुन्हा नोंद आहे. फिर्यादी सेवानिवृत्त शिक्षक रघुनाथ मोरे हे एटीएममधून पैसे काढण्यासाठी कॉर्नर चौक ते चौबारा रोडवरील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एटीएममध्ये गेले होते. त्यावेळी त्यांच्या पाठीमागे थांबलेल्या व्यक्तीने पिन नंबर पाहून कार्डाची अदलाबदल केली. नंतर त्यांच्या खात्यातून ३५ हजार ३०० रुपये काढून घेतले.

# पंडित जवाहरलाल नेहरु विद्यालय यणकीचा ९२%निकाल

## उज्वल निकालाची परमंपरा कायम



उदगीर (प्रतिनिधी) तालुक्यातील यणकी येथील पंडित जवाहरलाल नेहरु विद्यालयाचा दहावी चा निकाल ९२% लागला असुन शाळेच्या विद्यार्थ्यांनी उज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे.

उदगीर तालुक्यातील यणकी येथील पंडित जवाहरलाल नेहरु माध्यमिक विद्यालयाचा दहावी वर्गाचा निकाल ९२% लागला असुन यात यात विशेष प्राविण्यासह २२ विद्यार्थी उत्तिर्ण,प्रथम श्रेणीत १२ ,वव्दितिय श्रेणीत ८ विद्यार्थी उत्तिर्ण झाले आहेत नंदनी दामोदर लोणे या विद्यार्थिनीने ९१.६० %गुण घेऊन प्रथम तर स्नेहा ज्ञानेश्र्वर बिरादार ९१.२० ,तृतिय राजश्री पुरुषोत्म बिरादार ८९.४० गुण घेऊन उत्तिर्ण झिले शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी यशाची परंपरा कायम राखली आहे .गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष रामराव बिरादार ,सचिव ज्ञानेश्वर बिरादार, संस्थेचे सर्व सदस्य, मुख्याध्यापक अंगद बिरादार,व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# श्री संत गोविंद स्मारकचा १० वी बोर्ड परिक्षेचा ऐतिहासिक निकाल




**माधव होनराव**

जळकोट / प्रतिनिधी: महाराष्ट्र राज्य माध्यमिक १० वी बोर्ड परिक्षेचा ऑनलाईन निकाल ता. २७ मे रोजी लागला असून जळकोट तालुक्यातील श्री संत गोविंद स्मारक विद्यालयाचे ६८ पैकी ६६ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शाळेचा निकाल ९७ .५० % लागला आहे. या विद्यालयातील ४५ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह पास झाले असून प्रथम श्रेणीत - १८, द्वितिय श्रेणीत - ०२ व तृतीय श्रेणीत ०१ पास झाला आहे.विशेष म्हणजे या विद्यालयातील ११ विद्यार्थ्यांनी ९० % पेक्षा जास्त गुण घेतले आहेत.

उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे नाव व शेकडा गुण खालील प्रमाणे :

प्रिया यमुनवाड - ९४.०० टक्के (सर्वप्रथम), मुंडकर अंकिता - ९३. २० % (सर्वद्वितिय ), ताकबिडे संध्याराणी ९२. ६० % (सर्वतृतीय ), तसेच खंदाडे समिक्षा ९२. ४० %, कहाळेकर वैष्णवी ९२. ०० %, देशमुख श्रेया ९१. ८० %, कांबळे प्रशांत ९१. ६० %, बेल्लाळे श्र्वेता - ९१.२० %, कदम प्राची -९१ % , गोताळे नारायण - ९०.४० %, मोरे पृथ्वीराज - ८९. २० %, भूरे हणमंत - ८ ८. ८० %, सुर्यवाड यशोदा ८८.२० %, परीट भाग्यश्री - ८७.८० %, कुंडले राखी - ८७. २० % , धोंडापूरे गौरव ८६. ८० %, टेकाळे वैष्णवी ८६. ४० %, गोताळे विठ्ठल ८५ . ४० %, बनसोडे विजय ८५ .२० %, गोताळे किर्ती ८ ४. ८० %, सौदागर राजकुमार - ८४. ४० %, थोटे हणमंत - ८४. २० %, छत्रपती स्मिता - ८४.०० %, शेख सानिया ८३. २० %, कांबळे संध्याराणी ८२ . ०० %, परीट रोहीत - ८१. ६० %, शेख मसिरा - ८१. ४० %, शिवपुजे शिवम् ८१.४० %, स्वामी प्रथमेश ८१. २० % आदी विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

सर्व यशस्वी विद्यार्थ्याचे संस्थेचे संचालक श्रीकांत कुलकर्णी, किशन किडे, रामराव होनराव, रमाकांत चेबाळे, जगन्नाथ नळंदवार तसेच मु.अ. कदम जे. आर यांच्यासह सर्व शिक्षक -शिक्षकेत्तर कर्मचारी व पालकांनी अभिनंदन केले आहे.